




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक १७७ * नांदेड * रविवार, दि. ५ जुलै २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# जोरदार पाऊस, मुंबई-ठाण्यासह कोकणात जलमय परिस्थिती

## ▸ कोल्हापुरात पंचगंगेच्या पातळीत वाढ झाल्याने चिंता वाढली
## ▸ पुढील दोन दिवस राज्यात वादळासह मुसळधार पावसाचा इशारा

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात गेल्या २४ तासांपासून पावसाने रौद्ररूप धारण केलं असून राज्यभर पावसाचं जोरदार धुमशान सुरू आहे. मुंबईसह संपूर्ण कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भाला मुसळधार पावसाने झोडपून काढलं आहे. मुंबईत झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक सखल भागांना तलावाचे स्वरूप आले असून जनजीवनही विस्कळीत झाल्याचं दिसून आलं. पुढील दोन दिवस, म्हणजे ६ जुलैपर्यंत राज्यात बहुतांश ठिकाणी मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे गरज असेल तरच नागरिकांना घराबाहेर पडावं अशा सूचना हवामान खात्याने दिल्या आहेत.



सतत कोसळणाऱ्या पावसाच्या सरींमुळे मुंबईतील अनेक सखल भागात पाणी साचलेलं पाहायला मिळतंय. शहरात कुठे रस्ते खचले, तर कुठे झाडे कोसळण्याच्या गंभीर घटना समोर आल्या आहेत. मुंबई, ठाणे, पालघर आणि रायगड जिल्ह्यातील अनेक ठिकाणी जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झालं आहे. तर दुसरीकडे कोल्हापुरातही पंचगंगेच्या पातळीत मोठी वाढ झाल्याने चिंता वाढली आहे.

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये गेल्या दोन दिवसांपासून मुसळधार पाऊस कोसळत आहे. धरण क्षेत्रात सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे जिल्ह्यातील सर्वच नद्यांच्या पाणी पातळीमध्ये झपाट्याने वाढ झाली आहे. कोल्हापूरची जीवनवाहिनी असलेल्या पंचगंगा नदीची पातळी सध्या २२ फुटांवर पोहोचली आहे. अवघ्या २४ तासांत पंचगंगा नदीच्या पातळीत प्रचंड वाढ झाली आहे.

### मुसळधार पावसाने राज्यातील ११ धरणं भरली

राज्यभरात पावसाचा जोर कायम असून सर्वत्र पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. राज्यातील बहुतांश भागात आजही मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज आहे. परिणामी कोरडा गेलेल्या जूननंतर जुलैच्या पहिल्याच आढवाड्यात दमदार पावसामुळे बळीराजा सुखावला आहे. तर दुसरीकडे राज्यातील अनेक धारणक्षेत्र आणि नदी नाल्यांच्या जलसाठ्यात कमालीची वाढ झाली आहे. विदर्भातील भंडाऱ्याच्या गोसेखुर्द धरणाच्या पाण्याच्या विसर्गात मोठी वाढ करण्यात आली असून ३३ दरवाजे अर्धा मीटरनं सुरू करण्यात आले आहे. यातून १ लाख ३० हजार क्युसेक वेगानं पाण्याचा विसर्ग सुरु आहे. तर रायगड जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे जिल्ह्यातील २८ धरणांच्या पाणी पातळीत मोठी वाढ झाली असून ७ धरणे १०० टक्के भरली आहे.

# एसपी ॲक्शन मोडवर! वाहतुकीस अडथळा करणाऱ्यांची गय नाही; अतिक्रमण, अवैध पार्किंगविरूद्ध धडक मोहीम




**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली शहर वाहतूक शाखेकडून अतिक्रमण निर्मूलन आणि अवैध पार्किंग विरोधात विशेष मोहीम राबविण्यात आली.

शहरातील प्रमुख रस्त्यांच्या दुतर्फा होणारे अतिक्रमण आणि बेशिस्त पार्किंगमुळे दररोज वाहतूक कोंडी होत आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. ही बाब लक्षात घेऊन ही विशेष मोहीम हाती घेण्यात आली.

पोलीस निरीक्षक वाहतूक मारोती मुंडे यांच्या नेतृत्वाखाली सकाळी ११ ते दुपारी अडीच आणि सायंकाळी चार ते सात या वेळेत वजिराबाद चौक, महावीर चौक, जुना मोंढा, भगतसिंग चौक, गुरुद्वारा चौरस्ता आणि चिखलवाडी कॉर्नर या प्रमुख मार्गांवर कारवाई करण्यात आली.

या मोहिमेत शहर वाहतूक शाखेचे अधिकारी- कर्मचारी, १ आरसीपी पथक आणि नांदेड महानगरपालिकेचे पथक सहभागी होते. कारवाई दरम्यान रस्त्यावरील अतिक्रमणे हटविण्यात आली. हातगाड्या, फळविक्रेते, टपऱ्या आणि इतर अडथळे दूर करण्यात आले.

तसेच चुकीच्या पद्धतीने वाहने पार्क करणाऱ्या वाहनचालकांवर मोटार वाहन कायदा आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियम अंतर्गत दंडात्मक कारवाई करण्यात आली. या कारवाईत एकूण ५३ केसेस नोंदवून ५१ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

# पाकिस्तानात बस दरीत कोसळून ४० ठार

**पेशावर (वृत्तसंस्था)–** पाकिस्तानच्या खैबर पख्तुनख्वा प्रांतामध्ये क्वेट्टातून पेशावरकडे जाणारी प्रवासी बस दरीत कोसळल्याने ४० जणांचा मृत्यू झाला, तर आठ जण जखमी झाल्याची घटना घडली. हा अपघात डेरा इस्माईल खान जिल्ह्यात झाला. बसचे ब्रेक निकामी झाल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि बस एका अवघड वळणावरून थेट दरीत कोसळली, असे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

या अपघातातील जखमींवर उपचार सुरू असून बचाव तसेच मदतकार्य तातडीने राबवण्यात येत असल्याची माहिती आहे. बचाव पथकाच्या माहितीनुसार, अपघातावेळी बसमध्ये ४८ प्रवासी होते. बस क्वेट्टाहून निघाली तेव्हा त्यात ३६ प्रवासी होते, तर उर्वरित प्रवासी वाटेत बसमध्ये चढले होते.

# नांदेड-मुंबई आणि टनकपूर-नांदेड या दोन नवीन एक्सप्रेस गाड्यांचा उद्या शुभारंभ

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेडची रेल्वे संपर्क सुविधा अधिक बळकट करण्यासाठी दि. ६ जुलै, २०२६ रोजी दोन नवीन एक्सप्रेस गाड्या सुरू करण्यात येत आहेत. यामध्ये एक गाडी नांदेड-मुंबई आणि दुसरी टनकपूर-नांदेड दरम्यान धावणार आहे. या दोन्ही गाड्यांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी आणि केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे हिरवा झेंडा दाखविण्यात येणार आहे.

याशिवाय केंद्रीय राज्यमंत्री रवनीत सिंह, केंद्रीय राज्यमंत्री जितिन प्रसाद आणि केंद्रीय राज्यमंत्री अजय टम्टा हे देखील व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.

महाराष्ट्राचे मंत्री अतुल सावे, खासदार अशोकराव चव्हाण, विधान परिषद सदस्य व हरिद्रा संशोधन केंद्राचे अध्यक्ष ना. हेमंत पाटील, नांदेड-वाघाळा महानगरपालिकेच्या महापौर सौ. कविता मुळे, खासदार डॉ. अजित गोपछडे, खासदार रवींद्र चव्हाण, विधान परिषद सदस्य विक्रम काळे, विधान परिषद सदस्य सतीश चव्हाण, विधान परिषद सदस्य अमरनाथ राजूरकर, आमदार बालाजी कल्याणकर तसेच आमदार आनंद तिडके हे हजूर साहिब नांदेड रेल्वे स्थानकावर आयोजित स्थानिक कार्यक्रमास उपस्थित राहतील.

महाराष्ट्रातील रेल्वे विकासाला अलीकडील काळात मोठी गती मिळाली असून, पायाभूत सुविधा विकास, क्षमता वृद्धीची कामे आणि रेल्वे स्थानकांच्या व्यापक आधुनिकीकरणाची अनेक कामे हाती घेण्यात आली आहेत. राज्यातील रेल्वे संपर्क अधिक मजबूत केला जात असून, जनतेच्या वाढत्या अपेक्षा पूर्ण करण्यात त्याची महत्त्वाची भूमिका आहे. याच दिशेने हजूर साहिब नांदेड येथून दोन नवीन एक्सप्रेस गाड्या सुरू करण्यात येत आहेत. यापैकी एक गाडी राज्याच्या राजधानी क्षेत्राशी तर दुसरी देवभूमी उत्तराखंडशी थेट रेल्वे संपर्क उपलब्ध करून देणार आहे.

ह्या गाड्या नांदेड-मुंबई-नांदेड एक्सप्रेस आठवड्यातून दोन दिवस अकोला व मनमाड मार्गे धावेल. या गाडीत आरक्षित तसेच अनारक्षित प्रवासाची सुविधा उपलब्ध असेल. टनकपूर-नांदेड साप्ताहिक एक्सप्रेस नांदेडहून रविवारी तर टनकपूरहून मंगळवारी धावेल. ही गाडी महाराष्ट्रातील महत्त्वाच्या स्थानकांना देवभूमी उत्तराखंडशी थेट रेल्वे संपर्क उपलब्ध करून देईल. सुरक्षित, आरामदायी, किफायतशीर व सोयीस्कर प्रवासाची सुविधा उपलब्ध होईल. पर्यटन व तीर्थयात्रेला चालना मिळेल. व्यापार व वाणिज्याच्या संधींमध्ये वाढ होईल. देशाच्या पश्चिम व उत्तर भागांमधील रेल्वे संपर्क अधिक मजबूत होईल. आरोग्य व शिक्षण सुविधांपर्यंत अधिक चांगली पोहोच उपलब्ध होईल. विद्यार्थी, व्यावसायिक, कुटुंबे, भाविक, पर्यटक आणि उद्योजक यांना अधिक आरामदायी व सोयीस्कर प्रवासाची सुविधा मिळेल. प्रदेशाच्या सामाजिक व आर्थिक विकासाला चालना मिळेल.

# पंतप्रधान मोदींना जीवे मारण्याची धमकी

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** पंतप्रधान नरेंद्र मोदी ९ जुलै रोजी ऑस्ट्रेलियन दौऱ्यावर जाणार आहेत. मात्र त्यापूर्वी त्यांना सोशल मीडियावरून जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. सदर प्रकरणाची ऑस्ट्रेलियन फेडरल पोलीस चौकशी करत आहेत. या प्रकरणावर अद्याप केंद्र सरकार आणि परराष्ट्र मंत्रालयाची प्रतिक्रिया समोर आलेली नाही.

९ जुलै रोजी मेलबर्नच्या मार्व्हल स्टेडियममध्ये मेलबर्न मीट्स मोदी या सार्वजनिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या प्रचारासाठी फेसबुकवर पोस्ट करण्यात आली आहे. या पोस्टखाली आलेल्या कमेंटमध्ये कथित धमकी देण्यात आली. ऑस्ट्रेलियन माध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार, सदर कमेंट अबू मुस्तफा नावाच्या फेसबुक अकाऊंटवरून करण्यात आली होती.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपचारासाठी ठाण्यातील खासगी रुग्णालयात दाखल

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना अचानक रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. एकनाथ शिंदे यांची प्रकृती अचानक बिघडल्याने त्यांना शुक्रवारी ठाण्यातील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांच्यावर सध्या तज्ज्ञ डॉक्टरांच्या निगराणीखाली उपचार सुरु असून एकनाथ शिंदे यांनी प्रकृती पूर्णपणे स्थिर आहे.



प्राथमिक माहितीनुसार, गेल्या काही दिवसांमध्ये कामाचा अतिताण आणि प्रचंड दगदग याचा परिणाम एकनाथ शिंदे यांच्या प्रकृतीवर झाला आहे. यामुळे शुक्रवारी विधिमंडळाचे कामकाज सुरु असताना एकनाथ शिंदे यांना ताप आला होता. तसेच त्यांना प्रचंड अशक्तपणा जाणवत होता. शुक्रवारी ठाण्यातील गंगुबाई शिंदे सभागृहात दुपारच्या सुमारास धुळ्यातील ठाकरेंच्या शिवसेनेच्या उपनेत्या शुभांगी पाटील यांचा पक्षप्रवेशाचा कार्यक्रम पार पडणार होता. मात्र, एकनाथ शिंदे यांची प्रकृती बिघडल्याने सर्व कार्यक्रम रद्द करण्यात आले. यानंतर एकनाथ शिंदे हे तातडीने ठाण्यातील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल झाले. सध्या ते रुग्णालयातच असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. मात्र, एकनाथ शिंदे यांच्या प्रकृतीबाबत कोणतीही विशेष काळजी करण्याचे कारण नाही, असे शिवसेनेतील सूत्रांकडून सांगण्यात आले आहे.





**नांदेड :** विधान परिषद निवडणुकीमध्ये यश मिळविल्यानंतर आमदार अमरनाथ राजूरकर यांनी आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या संपर्क कार्यालय येथे भेट दिली. यावेळी आ. चिखलीकर परिवाराच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी माजी मंत्री विनायकराव पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर, लोहा नगरपालिकेचे नगराध्यक्ष शरद पवार, कंधार नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष मन्नान चौधरी, कंधार नगरपालिकेचे नगरसेवक समीर चाऊस आदींची उपस्थिती होती.

# सरकारकडून कांद्याच्या खरेदी दरात २५० रुपयांची वाढ

**मुंबई (प्रतिनिधी)–** गेल्या काही दिवसांपासून कांदा उत्पादक शेतकरी चिंतेत होते. अशातच काही प्रमाणात कांद्याच्या दरात वाढ झाल्यानं दिलासा मिळाला आहे. सरकारकडून १ हजार ९७५ रुपये दरानं कांद्याची खरेदी केली जात होती. आता यामध्ये २५० रुपयांची वाढ केली आहे. आता सरकारनं कांद्याचे दर २ हजार १२५ रुपये प्रतिक्विंटल केला आहे.

कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न सरकारने केला होता. सरकारकडून १ हजार ९७५ रुपये दरानं कांदा खरेदी केला जात होता. पण आता २ हजार १२५ रुपये प्रतिक्विंटने कांद्याची खरेदी केली जाणार आहे.

केंद्र सरकारच्या किंमत स्थिरीकरण निधी योजने अंतर्गत २ लाख मेट्रिक टन कांदा खरेदीचे उद्दिष्ट ठेवत मे महिन्यात १ हजार २३५ रुपये प्रतिक्विंटल दराने नाफेड व एन.सी.सी.एफ मार्फत कांदा खरेदी सुरू करण्यात आली. मात्र बाजारभावापेक्षा कमी दर मिळत असल्याने शेतकऱ्यांनी शासकीय कांदा खरेदी केंद्रांकडे पाठ फिरवल्याने मागील दोन महिन्यात केवळ ७ हजार मेट्रिक टन कांदा खरेदी करण्यात आला आहे.



# पावसाचा इशारा: गोदावरी काठच्या सखल भागांचा आयुक्तांनी घेतला आढावा



**नांदेड (प्रतिनिधी)–** भारतीय हवामान विभागाने नांदेड जिल्ह्यात पुढील काही दिवस मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा दिल्यानंतर महानगरपालिका प्रशासन ॲक्शन मोडमध्ये आले आहे. नागरिकांची सुरक्षा आणि संभाव्य पूरपरिस्थिती टाळण्यासाठी मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी शुक्रवारी शहरातील संवेदनशील भागांची प्रत्यक्ष पाहणी करून आपत्ती व्यवस्थापन सज्जतेचा आढावा घेतला.

आयुक्तांनी सकाळीच शहरातील पूरप्रवण क्षेत्र, मुख्य नाले आणि गोदावरी नदीकाठच्या सखल भागांना भेट दिली. यामध्ये उर्दू घरानजीकचा नाला, असदवन ते लातूर फाटा नाला, रवि नगर ते कौठा पोलीस चौकी आणि शगून सिटी या भागांचा समावेश होता. शगून सिटीतील नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. पाणी साचण्याची शक्यता असलेल्या ठिकाणी तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

नाल्यांमध्ये कचरा अडकून पाणी तुंबू नये यासाठी अतिरिक्त सफाई कर्मचारी आणि यंत्रसामग्री तैनात करण्याचे आदेश देण्यात आले. तसेच मनपाचा मुख्य आपत्ती व्यवस्थापन कक्ष २४ तास तीन शिफ्टमध्ये सुरू ठेवण्याचे आदेश दिले. सर्व झोनल अधिकारी आणि अभियंत्यांनी मुख्यालय न सोडता सज्ज राहावे, अशा सूचनाही आयुक्तांनी केल्या.

या पाहणी दौऱ्यात अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, शहर अभियंता सुमंत पाटील, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. मिर्झा फरहतुल्ला बेग, कार्यकारी अभियंता दिलीप टाकळीकर, क्षेत्रीय अधिकारी रावण सोनसळे, कनिष्ठ अभियंता ठाणेदार आदी अधिकारी उपस्थित होते.




# फाटकी चड्डी



दोनशे घराचं डोंगराच्या कुशीत हरवलेलं एक गाव होतं. निसर्गानं दोन्ही हाताने भरभरून या गावाला नैसर्गिक देन दिली होती. गावाच्या वेशीवर शाळा होती. जमिनीच्या लहान लहान तुकड्यांवर या गावातल्या लोकांची पोटं भरत होती. गावात एकोपा आणि प्रेमभाव नांदत होता. तालुक्याला जायला आठवड्यातून एकदाच एस. टी. या गावात यायची. या गावात वीज नव्हती. दळणयंत्र नव्हतं. नळ नव्हते. तर करमवणुकीसाठी सेलवर चालणारे रेडिओ, ऊजेडासाठी कंदील, दिवे, चिळी आणि पाण्यासाठी विहीर, नदी, ओढे होती.

बाल्या नेहमीप्रमाणे लवकर ऊठला. टमरेट घेऊन परसाकळे लवनात गेला. डुकरं आधीच ठाण मांडून बसले होते. एक डुक्कर आणि डुकरीननं आपली वंशावळ गावात वाढवली होती. लहान लहान डुकरं मायच्या मागं मागं धावत पळत राहत. बाल्या लवनात गेला. जसा हागला तसे डुकरं मागून येऊन गू खायला लागले. बाल्या दगड घेऊन डुकरं हाकलत होता, पण भूकेमुळे डुकरं ऐकत नव्हती ती भुकीने पिसाळली होती. रंगीबेरंगी माश्या गुनगुनत गुवावर येऊन बसत होत्या. बाल्या ऊठून थोड्या अंतरावर जावूनं बसला. क्षणातच डुकरांनी तोंडाची चुंबळ खोलून गू सफाचक केला. बाल्याच्या मनात विचार आला. तो स्वतःशीच बोलला. 'खरे स्वच्छता दूत आहेत हे. 'डाव्या हाताने ढुंगन धुवूनं बाल्या घरी आला. न्हानीत जाऊन डावा हात जमिनीवर घासूनं पाण्याने धुतला. अंगणातल्या विठोल्यातून त्याने राख डाव्या तळवावर घेतली आणि अंगणात बाजीवर बसून दात घासायला लागला. पहाटेचे सहा वाजले होते. गुरढोर आणि गावातल्या लोकांची शेताकळे जायला लगबग सुरू झाली होती. वसरीत निझलेली बाल्याची माय अंगमोळी देत ऊठली आणि स्वतःशीच बोलली. माय अज ऊठाले ऊशीर झाला वाटते. दिवस किती ऊजाळला.

बाल्या ऊठला काय रे बाबू. पार्वतीबाई बोलली. हव मा आताच ऊठलो घळीभऱ्या आंधीच. एक काम कर बाबू खतावरून तुऱ्हाट्या अन् पऱ्हाट्याचा कवटा आनं बरं.

बर मा आनतो. टेम्पे ही आनू काय. हव आन अन् हाव दोन तीन गवऱ्या ही आनजो. बाल्या हा गावातल्या शाळेत चवथीत शिकत असतो. त्याचं वय दहा वर्षे. पार्वतीबाई आणि वसंतराव यांचा तो मुलगा.

मा हे घे तुराट्या अन् पऱ्हाट्या. असं म्हणत त्याने कवटा अंगणात आदळला. बाबू एक काम करनं अखिनं. सळा सारोनाले गाईचं शेनं आन. बाल्यानं टोपलं ऊचलल आणि शेजारच्या गणपत बुवाच्या गोठ्यात शिरला. टोपलभर शेण भरलं तितक्यात गणपत बुवा बाल्याले बोलला. गीलास घेवून येजो बे पोट्ट्या आताच तात दूध काहाळलं. बाल्यानं मान डोलवत भरलेलं टोपल कन्हारत ऊचलल डोक्शावर घेतलं आणि तो रस्त्यानं चालत घरी येतांनी फुटलेल्या टोपल्यातून शेणाचा वघळ बाल्याच्या डोक्यावरून नाकावर आला. जसा काय हिरवा टिळा लावला. तो घरी आला. टोपल खाली ठेवलं.

मा शेन आनल. गणपत बुडा म्हने दूध घेऊन जाय. काश्याचा गिलास घेवून जाय अन् आनं दुध. बरं मा. अस म्हनून तो निघाला. आबा ओ आबा. कोन व्हय बे. आबा मी व्हय बाल्या. दुदाले आलो. आन गीलास ईकळे. खिरूजही देवू काय बे. म्हैस जंदली ईतवारी. मायले ईचारून सांगतो.

लयच गुनाचा हाय लेका तू. मायले ईचारल्या बगर सायाच्या काहीच करत नाही. बर आबा जातो मंग मी. अस बोलून बाल्यान गीलासात घरी दुध आनलं. मा गणपत आबा खिरूज देवू काय म्हनतात. तुले त लयच आवळते आनजो न मंग. संध्याकायी आनिन. शाळेले उशिर होईन ना मंग. मा एक गोठ सांगू काय.देशिन काय मले. काय गोठ आहे सांग. मा मले शायेची नयी चड्डी देनं व घेवूनं. चड्डी ढुंगनावर ईरली. शायेतले सारे पोट्टे मले चिळवतात. खेये फुगळी अन् गांड ऊघळी. अस बोलून हासतात माह्यावर. हासतीन तेयचे दात दिसीनं. तू ध्यान नोको देवू तेयच्यावर आन ईकळे चड्डी बात ठिगय लावूनं देतो मंग त झालं. हव मा तसच कर.

असं बोलून बाल्यानं हरकिजान गाठोयातली चड्डी काहाळली. मायन नियं ठिगय घेतलं. सुईत धागा ओयला अन् ठिगय लावलं. मा चड्डी खाकी त्वा ठिगय लावलं नियं अन् शिवाले धागा पांडा अंतरंगी पचरंगी नाही काय दिसत. बाबू फाटक घालाव पन् नेटक घालाव. फाटलेल्या चड्डीतून ढुंगन दिसते. ठिगयातून दिसते काय. बरोबर मा. मस्त शिवली चड्डी मले लैच आवळली. बाल्यानं चड्डी घातली. पांढा सदरा घातला. सदरा आखूळ असल्यानं ठिगयाची चड्डी दिसून पळत होती. बाल्यानं खा च तेल डोक्शाले अन् हातापायाले चोपळलं चांगभांग केला. ऊल्स जवारीच पीठ तोंडाले पावडर सारख लावलं. पॅरेगॉनची टुटलेली निई चप्पल घातली अन् पुस्तकाचा झोरा ऊचलूनं गान गुनगुनत शाळेत चाल्ला तसे त्याच्या मांगून येणारे दोन पोरं सुभाष अन् मनोज ठिगयाची चड्डी पाहूनं जोरजो-यात हासले.

बाल्या बोल्ला.

कामून हासता बे. मनोज म्हनते कसा. अबे बाल्या लेका त्वाल्या ढुंगनाले दो डोये हायेत ना त्याले हासूनं राह्यलो आमी. ढुंगन को नही चड्डी अम्मा पकाना बकरेकी हड्डी. अशी गोठ हाय लेका बाल्या तुही. दर ईतवारी माहागी मोलाच मटन खाता पन् शाळेची चड्डी घेत ना. वा रे वाह अजाबराव. काहाले ठिगय लावल साजरी हवा लागते ना मांगून.

मी चड्डीले ठिगय लावन नाहीत गल्लीनं भोंगया फिरनं तुले काय घेन ना देनं. घेन देनं चल तुले शायेत दाखोत. चल त खरी शायेत. तुह्या बापाले भेतो काय मी चल.

बाप काहाळल्यावर मनोज च डोक्स गरम झालं. अन् बाल्या अन् मनोजची घोयसम घायसम कुस्ती फुफाट्यात रंगली. दोघही फुफाट्यात फुरकेटरक झाले. गावातला ढोरकी ढोर घेवून जंगलात जात असतानी त्याले पोट्यायचे भांडन दिसले थो धावतच आला अन् साप मुंगसावानी भिळलेले बाल्या अन मनोजले त्यान वालं केलं.

काबे साये पोट्टेहो शाया शिकता ना तुमी काय गधे वायता लेकहो. काहाले भांडू राह्यले बे दुस्मानासारखे. बाल्या बोलला. मामा यान मले चड्डिच्या ठिगयावरूनं चिळोलं पयले अन हाच माराले पयले धावला. मी त मुकाट्यानं शाळेत चाल्लो होतो. चालत्या बंडीचा खिया यानं काहाळला पयले. मंग माह्याही गांडीची आग झाली मंग म्याही घोयसलं सायाले. मनोज बोलला.

मामा यानं माह्या बाप काहळला म्हनून मारलं याले. ढोरकी पुंजाजी एखांद्या कोर्टाच्या न्यायधिशावानी दोघायच आयकत मान डोलवत होता त सुभाष वकिलावानी बोलन आयकूनं गालात हासत होता. तसा कय लावनारा सुभाषचं होता. थ्याच रसत्यान तेयच्या वर्गातला किस्ना लयच सज्जन असलेला पोरगा येत होता. चला ना बे पोट्टे हो शाळेत घंटा कवाचा वाजला. अस बोलून पटपट पाय ऊचलत किस्ना चाल्ला गेला. मनोज सुभाषही शायेच्या दिशेनं निंघाले. बाल्या मात्र घराच्या दिशेनं निंघाला. घरी आला दप्तर जोरात दारात आपटल.

कारे काय झाल कामून वापशी घरी आला. मा मी नाही जात शायेत. कामून काय झालं थे तरी सांग. काय काही झोंबल तुले नि-हा भुरकाटरक झाला. गध्यावानी लोयला काय रसत्यावर.

मा मले फाटक्या चड्डीवरून पोट्टे चिळवतात. अरे ठिगय लावलं ना. तरी चिळोतात. मले नयी चड्डी जवरक देत नाही तवरक मी शायेत जानार नाई. सुभ्या अन् मन्या मले लय चिळवतात. अगल्या इतवारी घेवू हां बाबू. जाय आता पटकन शायेत. नाहीत संध्याकायी मास्तर टेंबलत घरी येईन.

येवू दे भेतो काय थ्याले मी. सुभ्या अन् मन्याचे वाटी जाने सांगतो त मास्तरही हासते. आता लय झालं जवा नयी चड्डी भेटन तवाच मी शायेत जायनं नाहीत ढोरं चारन. बाबू तुह्या बापाची पूरी जिंदगी कष्ट ऊपसत चाल्ली अन् तू म्हनत ढोरं चारीनं. खबरदार आता डबलून असा बोल्ला त. मायचे बोलने आयकून बाल्यानं धूम ठोकली अन् नदीवर मासोया खेकळे पकळाले गेला. गावातले भोई डोक, टेपळ्या, वायर मासोया पकळत होते अन् नदीच्या काठावर असलेल्या भोकात पानी टाकून खेकळे पकळून नांग्या तोळूनं टोपलीत टाकत होते. बाल्यालेही मासोया पकळता येत होत्या. वाह्यत्या नदीत दोन्ही हात टाकूनं टिचक्या मारून थो मासोया पकळत होता. मासोई पकळ्ली की थे साबनी सारखी निसटत होती. मासोया पकळून थो काठावर फेकत होता. जानराव भोयाले हरीक होत होता.

लयच तरबेज हाय लेका तू पटालकन् मासोया पकळत. तिकळे पुळे नोको जावू तिकळे डो हाय. आसरा माय राह्यते थ्यात. जानराव भोई अस बोलल्यावर बाल्याची फटारली. थ्यान दोन बुचकया मारल्या अन् काठावर आला. सयसंध्याकाय झाली तरी पोरगं घरी आल नाही म्हनून अवघ गाव पार्वतीबाई फिरली घरोघरी ईचारल पन पोराचा पत्ता लागला नाही. बाल्याले भूक लागली चार पाच मासोया घेवून थो घरी आला. पार्वतीबाईन ईचारपूस केली. लाळानं बाल्याले मांडीवर बसोलं अन थ्याले चड्डी दाखोली. खाकी चड्डीले तीनं खाकी रंगाच ठिगय लावल होतं. बाल्या खुश झाला पोटभर पार्वतीबाई नवरा अन बाल्या जेवले अन् दुस-या रोजी कपळे घालून बाल्या. निंघाला पन् मनोज अन् सुभाष डबलून थ्याले हासले.


**-सु. पुं. अढाऊकर**
अकोला
मो. ९७६९२०२५९७

---

# किस्ना' : स्त्रीमनाचा संवेदनशील वेध घेणारा कथासंग्रह

**पुस्तक परीक्षण**

**-सौ. सुचिता वडजे (जोगदंड)**
नांदेड




दोन-तीन दिवसांपूर्वी भारत दाढेल यांची भेट झाली. पहिल्याच भेटीची आठवण म्हणून त्यांनी त्यांचे 'किस्ना' आणि 'नावाडी' हे दोन कथासंग्रह मला भेट दिले.

घरी आल्यानंतर सासूबाईंची नजर 'नावाडी'वर पडली आणि वाचनाची आवड असल्याने त्यांनी त्यावर लगेचच कब्जा केला. त्यामुळे माझ्या वाट्याला 'किस्ना' आला. कथासंग्रहाची सुरुवातच मारुती कसाबसान यांच्या अभ्यासपूर्ण आणि प्रभावी प्रस्तावनेने होते. लेखकाच्या लेखनप्रवासाचा वेध घेणारी ही प्रस्तावना वाचकाला कथा विश्वात सहज घेऊन जाते.

भारत दाढेल यांच्या लेखनशैलीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे चित्रदर्शी वर्णन. कथा वाचताना जणू एखादा दिग्दर्शक पटकथा आपल्या डोळ्यांसमोर उभी करत आहे, असा भास होतो. प्रत्येक प्रसंग, प्रत्येक पात्र आणि प्रत्येक वातावरण इतके जिवंत वाटते की, वाचक नकळत त्या कथेत समरस होतो.

'पऱ्याग' ही कथा जुन्या रूढी-परंपरांमुळे स्त्रीला मिळणारी दुय्यम वागणूक आणि तिच्या आयुष्यातील वेदना प्रभावीपणे उलगडते.

'गवळण' या कथेत सुखी संसारावर पैशाचा मोह कसा घाला घालतो आणि त्यातून अनेकांचे आयुष्य कसे उद्ध्वस्त होते, याचे वास्तववादी चित्रण आहे.

'सुकबीर' ही कथा जुन्या काळातील चित्रपटवेड, नायकांप्रती असलेले आकर्षण आणि काल्पनिक प्रेमविश्व यांचे अत्यंत हळवे चित्र रंगवते. 'बबीता' या प्रत्यक्षात नसलेल्या पात्रावर सुकबीरचे जडलेले प्रेम, तिच्या भेटीची ओढ आणि अपूर्ण राहिलेल्या स्वप्नांचा विरह मनाला स्पर्श करून जातो.

'श्यामर' या कथेत पाल टाकून राहणाऱ्या समाजातील श्यामरच्या मनात फुललेले प्रेम, अंजूची प्रेमस्वीकृती आणि अनेक वर्षांनंतर मित्राशी झालेला संवाद अत्यंत हृदयस्पर्शी वाटतो.

'...आणि मी हिरो झालो' या कथेत चित्रपटसृष्टीचे आकर्षण, मोठी स्वप्ने पाहणाऱ्या एका शालेय मुलाची धडपड, मुंबई गाठण्याचा प्रयत्न आणि आर्थिक परिस्थितीमुळे अपूर्ण राहिलेले स्वप्न यांचे अत्यंत वास्तव चित्रण आहे.

'पारूबाई' ही कथा मन हेलावून टाकणारी आहे. बालवयापासून सुरू झालेला संघर्ष, नात्यांतील विश्वासघात, मामाच्या वासनांध वृत्तीमुळे झालेली घुसमट, तमाशातील जीवन, समाजाची उपेक्षा आणि अखेरीस आलेले बेवारस एकाकी मरण या सर्वांचा अत्यंत संवेदनशील वेध लेखकाने घेतला आहे.

'रम्या' या कथेत दुष्काळ, गरिबी, आर्थिक विवंचना, रक्ताच्या नात्यांतील स्वार्थ, आईची झालेली अवहेलना आणि शिक्षणाच्या जोरावर उभे राहण्याचा संघर्ष प्रभावीपणे मांडला आहे.

'किस्ना' ही या संग्रहातील अत्यंत हृदयस्पर्शी कथा आहे. कर्तव्यदक्ष, स्वाभिमानी आणि संस्कारी स्त्रीच्या आयुष्यातील संघर्ष, सासू-सुनेतील गैरसमज, संसार टिकवण्यासाठी केलेली धडपड, गाव सोडण्याची वेळ, पायी केलेला प्रवास, उपासमार, नवऱ्याची साथ आणि नव्या उमेदीने पुन्हा जीवनाला सामोरे जाण्याचा निर्धार या कथेत प्रभावीपणे व्यक्त झाला आहे.

एकूणच 'किस्ना' हा कथासंग्रह स्त्रीजीवनातील संघर्ष, शोषण, रूढी-परंपरांचे ओझे, नात्यांतील गुंतागुंत, तमाशा कलावंत स्त्रियांचे जीवन, वृद्धापकाळातील एकाकीपण, स्वाभिमान आणि जगण्याची जिद्द यांचे अत्यंत संवेदनशील चित्रण करणारा आहे.

प्रत्येक कथा स्त्रीमनाचा वेध घेते. स्त्रीच्या भावविश्वात शिरून तिच्या मनातील वेदना, स्वप्ने, आशा आणि संघर्ष यांचे सूक्ष्म चित्रण लेखकाने केले आहे. शोषित, वंचित आणि पीडित स्त्रियांच्या जीवनगाथेला कथारूप देण्याचे मोलाचे कार्य भारत दाढेल यांनी केले आहे. त्यांची प्रभावी, चित्रदर्शी आणि वास्तववादी लेखनशैली निश्चितच वाचकांच्या मनात घर करते.

---

## वारी

भक्तीचा सागर उसळला
निसर्गही गहिवरला
आनंदाने सरी कोसळू लागल्या...
आकाशी सजले सुंदर रंग
सर्वत्र नांदतो पांडुरंग
वनराई हिरवाईने नटली
इंद्रधनुष्याची कमान स्वागता सजली...
विठ्ठल दर्शनी निघाली सारी
पुढे चालली आषाढी वारी
टाळ मृदंगाचा गजर करी
भक्तीत रंगला वारकरी...
संतांची पाखली भारी
अभंग गात जारी सारी
भारुडाची मजा न्यारी
करमणुकीतून प्रबोधन करी...
सोहळा तो सुखकारी
रिंगण ते मनोहरी
जयजय श्रीकृष्ण हरी
गर्जवी वारकरी...
नाही कोणी लहान-मोठा
भक्तीला नसे इथे तोटा
दुजाभाव इथे नसे, माऊली सर्वत्र असे...
लागली ओढ पंढरपुरी
चित्त धावे चंद्रभागातीरी
मुखी तुझे नाम हरी
तुझाच जयजयकार करी...
तहानभूक हरपून जाई, पुढे पुढे चालत जाई
ध्यानीमनी फक्त विठाई, दुसरे काही सुचेना बाई...
नाही काही दुसरे मनी, मन लागे विठ्ठल चरणी
पाहीन देखणे विठ्ठल रूप, होई देह विठ्ठल स्वरूप.

**-डॉ. सौ. अनुपमा प्रशांत कोटलवार**
-संवेदन, हनुमान मंदिराच्या पाठीमागे
शिवाजीनगर, नांदेड

## आयुष्याचा खेळ

आयुष्याचा खेळ रंगतदार होण्यासाठी
प्रत्येक संकटाशी झुंज देत जगावं
जे आपल्याला आवडतं ते न मागता
जे आपल्यासाठी योग्य आहे तेच मागावं
सहानुभूतीच्या ओझ्याखाली दबून
कित्येक मने चिरडली जातात दररोज
इमानदारीची पातळी एवढी स्वच्छ असावी
आरशात स्वतःला स्वाभिमानाने बघावं
एक दिवसात कोणताही चमत्कार होत नसतो
कणा कणाने मेहनत रोजच वाढत जावी
कालचा विचार करत रडत न बसता
उद्याच्या यशकिर्तीचे पान सोनेरी अक्षराने लिहावं
जीवनाला पहावे सकारात्मक दृष्टीने
प्रत्येक दिवस नवी उमेद घेऊन मिळतो
येथे विकली जातात स्वप्ने निष्प्राण माणसांची
दररोज नव्या स्फुर्तीने कामाला लागावं

**पवन श्रीरंगसा कुसुंदल**
नंदीग्राम सोसायटी, नांदेड
मो. ९०७५५९५६९५

---

# संस्कार, समर्पण आणि सहजीवनाचा सुवर्णप्रवास : सौ. नंदाताई आणि ओमप्रकाश चालिकवार





काही व्यक्ती स्वतःच्या कर्तृत्वाचा गाजावाजा न करता आपल्या प्रेमळ स्वभावाने, कुटुंबवत्सल वृत्तीने आणि संस्कारांच्या बळावर अनेकांचे आयुष्य समृद्ध करतात. सौ. नंदाताई ओमप्रकाश चालिकवार यांचे व्यक्तिमत्त्व हे अशाच मूल्यांची जपणूक करणारे आहे. त्यांच्या ६५ व्या वाढदिवसानिमित्त, लग्नाच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त आणि आयोजित तुला कार्यक्रमाच्या निमित्ताने त्यांच्या जीवनप्रवासाकडे पाहिले, तर संघर्ष, त्याग, श्रद्धा आणि कुटुंबनिष्ठेची एक प्रेरणादायी कहाणी उलगडते.

नांदेडच्या किल्ला रोड परिसरात दिगंबर बंडेवार यांच्या घरात त्यांचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचे किराणा दुकान होते. तीन भावांमध्ये वाढलेल्या नंदाताईंवर लहानपणीच आईचे छत्र हरपले. त्यामुळे आजी-आजोबांनी, वडिलांनी त्यांचा प्रेमाने सांभाळ केला. कन्या हायस्कूलमध्ये दहावीपर्यंत शिक्षण घेतल्यानंतर अवघ्या सोळाव्या वर्षी त्यांचा विवाह ओमप्रकाश चालिकवार यांच्याशी झाला आणि एका नव्या संसाराची जबाबदारी त्यांनी समर्थपणे स्वीकारली.

त्यांचे मामा ह.भ.प. विठ्ठल हरिभाऊ ओमनकार हे कीर्तनकार असल्याने बालपणा-पासूनच धार्मिक, आध्यात्मिक आणि नैतिक संस्कार त्यांच्यावर झाले. एकत्र कुटुंबपद्धती, वडीलधाऱ्यांचा आदर, सर्वांना सोबत घेऊन चालण्याची वृत्ती आणि सेवाभाव ही मूल्ये त्यांच्या स्वभावात सहजपणे रुजली. सासू-सासऱ्यांची त्यांनी मनोभावे सेवा केली आणि त्यांना चारीधाम यात्रेचे पुण्य लाभावे यासाठी प्रयत्नपूर्वक दर्शन घडविले.

संसाराच्या वाटेवर अनेक चढ-उतार आले; पण प्रत्येक संकटात त्या पतीच्या खंबीर साथीदार ठरल्या. हैदराबादमधील संघर्षमय दिवस असोत किंवा व्यवसायातील आव्हाने, त्यांनी कुटुंबाचा आधारस्तंभ म्हणून जबाबदारी सांभाळली. ओमप्रकाश चालिकवार यांचा टुरिंग टॉकीज, चित्रपट वितरण आणि ऑइल मिलचा व्यवसाय अनेक वर्षे यशस्वीपणे उभा राहिला. या उद्योगांमधून सुमारे चाळीस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांचा उदरनिर्वाह चालत होता. या सामाजिक जबाबदारीतही नंदाताईंचा मोलाचा वाटा राहिला.

तीन मुलगे आणि एका मुलीला उच्च शिक्षण देऊन सक्षम केले. मुलांच्या विवाहानंतर सुनांनाही उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन देत त्यांनी शिक्षणाला नेहमीच सर्वोच्च प्राधान्य दिले. आज नातवंडांवरही संस्कारांची श्रीमंती रुजविण्याचे कार्य त्या प्रेमाने करीत आहेत. चित्रपट वितरण व्यवसायामुळे त्यांच्या घरी अनेक नामवंत कलाकार, दिग्दर्शक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांचे आगमन होत असे. माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान राज्यसभा खासदार अशोकराव चव्हाण, माजी आमदार अमिता चव्हाण, माजी मंत्री भास्करराव पाटील खतगावकर, ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे, ज्येष्ठ अभिनेते महेश कोठारे यांच्याशी निर्माण झालेले स्नेहबंध हे त्यांच्या साधेपणा आणि जिव्हाळ्याच्या स्वभावाचेच प्रतीक आहेत. सुख-दुःखाच्या प्रत्येक प्रसंगी खा.अशोकराव चव्हाण आणि अमिताताई चव्हाण यांनी त्यांच्या कुटुंबाला दिलेला आधारही तेवढाच महत्त्वाचा ठरला.

आजही सौ. नंदाताई भगवद्गीतेचे नियमित वाचन, धार्मिक कार्यक्रमांतील सक्रिय सहभाग आणि अध्यात्माशी असलेली निष्ठा यामुळे नव्या पिढीसाठी संस्कारांचा दीप प्रज्वलित ठेवला आहे. त्यांचे आयुष्य हे केवळ एका गृहिणीचे नव्हे, तर प्रेम, त्याग, सेवा, श्रद्धा आणि कुटुंबमूल्ये जपणाऱ्या एका सुसंस्कृत भारतीय स्त्रीच्या जीवनतत्त्वज्ञानाचे प्रेरणादायी उदाहरण आहे. त्यांच्या अमृतमहोत्सवी जीवनप्रवासाला आणि सुवर्ण सहजीवनाला मनःपूर्वक शुभेच्छा! त्यांना उत्तम आरोग्य व सौख्य लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

**-संतोष कुलकर्णी**

---

# झाडे लावा आणि सुंदर जगा

पृथ्वीतलावरचा एकमेव हुशार असलेला प्राणी म्हणजे मानव आहे. पण मानवाच्याच हातून बरेचसे नुकसान होताना दिसत आहे. त्यातलेच एक म्हणजे कमी होत असलेले झाडांचे प्रमाण आहे.

खरंतर दिवसेंदिवस जिकडे तिकडे झाडेच झाडे दिसायला पाहिजे होते पण तसं दिसत नाही. उलट झाडांचे प्रमाण वाढण्यापेक्षा कमी होताना दिसत आहे. आणि यातूनच सध्या मानव आपलं कर्तव्य विसरून जात असल्याची भीती निर्माण होत आहे. म्हणून या हुशार माणसाने निसर्गाशी तितक्याच हुशारीने माणसासारखं वागलं पाहिजे तर आणि तरच निरोगी व सुंदर जीवन जगता येईल.

मानवाला धरतीवरती सुखा-ने जगायचं असल्यास काही गोष्टीचं नियोजन केलंच पाहिजे. त्यात सर्वप्रथम झाडे लाव-ली पाहिजे. नीट संगोपन करून त्याला जगवले पाहिजे. कारण बऱ्याचदा असं होतं की, नुसती नावालाच झाडे लावले जा-तात, वास्तव वेगळेच असते. म्हणून थोडी जरा अधिकची काळजी घेतली तर या सिमेंटच्या जंगलामध्ये थोडी थोडी झाडांची सावली वाढली की माणसांच्या जीवासोबत अनेक जीवजंतू पशु-पक्षी वन्यप्राण्यांचे ही जीवन भरपूर सुंदर होते याची प्रचिती मिळते. मानवाला हवेची जितकी गरज आहे? त्याच्या कितीतरी पटीने गरज आहे ती म्हणजे झाडांची. कारण एक झाड अनेक गुणांनी समृद्ध असते. सर्वांच्या आरोग्यासाठी प्राणवायू देणारे व जीवन सुदृढ ठेवण्यासाठी वनस्पतींचा खजाना घेऊन उभे टाकलेले असते. त्यासोबतच झाडांच्या सावलीने जमिनीला थंडावा मिळतो. फळे मिळतात...

धरती आणि निसर्गाचं कालचक्र अबाधित ठेवण्यासाठी झाडं सतत प्रयत्नशील असतात. एक वेळ माणूस बदलेल पण झाड बदलत नाही. तसेच झाडांच्या निमित्ताने पाण्याची पातळी ही टिकून राहण्यास मदत होते असे म्हणतात.

भविष्याची चिंता करून प्रत्येक माणसाने किमान प्रतिवर्षी एक तरी झाड लावून त्याला वाढवले पाहिजे. मग तुम्ही कोणतेही औचित्य साधा, पण झाडे लावा. तुमचे एक झाड सर्वांचे रक्षण करण्यासाठी तत्परतेने आणि खंबीरतेने दंड थोपटून उभा असेल... तुमचं सुदृढ जीवन अबाधित ठेवण्यासाठी झाडांकडून खात्री नक्कीच पटेल. मग काय, कसला विचार करता? झाडे लावून सुंदर जगा. कारण या धरतीचे रखवाले तुम्हीच आहात.

**- गोविंद कवळे**
इळेगाव, ता. उमरी,
जि. नांदेड
मो. ७३८७२६७२१९

# जिल्हास्तरीय कर्मचारी समाधान शिबिरात जिल्ह्यातील ३७ विभागांचा सहभाग



**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हास्तरीय कर्मचारी समाधान शिबिराचे आयोजन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे करण्यात आले. या शिबिरास जिल्ह्यातील ३७ विभागांनी सहभाग नोंदविला. प्रारंभी निवासी उपजिल्हाधिकारी यांनी शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कर्मचारी समाधान शिबिराच्या उद्दिष्टांबाबत व कार्यपद्धतीबाबत सविस्तर माहिती दिली.

विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांचे परिपत्रक २ मे २०२६ नुसार शासन सेवेत कार्यरत असलेल्या तसेच शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी–कर्मचाऱ्यांच्या सेवासंबंधित विविध अडचणी जसे वेतन, बढती, बदली, निवृत्ती वेतन, सेवानिवृत्ती उपदान, रजा, सेवापुस्तीका अद्ययावतीकरण, वरिष्ठता इत्यादी वेळेवर आणि कार्यक्षमतेने सोडवावयाच्या आहेत. त्यासाठी प्रत्येक महिण्याच्या पहिल्या शुक्रवारी जिल्हा तसेच तालुका स्तरावर कर्मचारी समाधान शिबिराचे आयोजन केले जात आहे.

या शिबिरात प्रत्येक विभागातील सेवाविषयक प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेऊन ती तत्काळ निकाली काढण्याबाबत तसेच त्याबाबतचा अहवाल नियमानुसार सादर करण्याच्या सूचना सर्व विभाग प्रमुखांना दिल्या. या जिल्हास्तरीय शिबिरात एकूण ४ तक्रारी प्राप्त झाल्या असून, तालुकास्तरीय शिबिरात १ तक्रार प्राप्त झाली आहे. शिबिरास सर्व विभाग प्रमुख अथवा कार्यालय प्रमुख यांची उपस्थिती अनिवार्य राहील.

संबंधित अधिकारी, कर्मचारी, तक्रारदार तसेच कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींना उपस्थित राहण्याबाबत सूचना देण्यात याव्यात. जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय सेवाविषयक प्रकरणे संबंधित स्तरावर स्वीकारून त्यांचा नियमानुसार व वेळेत निपटारा करण्यात यावा, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले.

सर्व कार्यालयांनी सेवा-विषयक प्रलंबित प्रकरणांची अद्ययावत यादी तयार करून ती कर्मचारी समाधान शिबिरात समाविष्ट करावी. कोणतेही सेवाविषयक प्रकरण विनाकारण प्रलंबित राहणार नाही याची दक्षता घ्यावी. गुंतागुंतीच्या प्रकरणांमध्ये आवश्यक त्या कालावधीत उच्च प्राधिकरणाकडे प्रस्ताव सादर करून त्याचा पाठपुरावा करावा, असेही जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी स्पष्ट केले.

सेवाविषयक प्रकरणांमध्ये अनावश्यक दिरंगाई झाल्यास संबंधित विभागाची जबाबदारी निश्चित करून सक्षम प्राधिकाऱ्यांकडे अहवाल सादर करण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. प्रत्येक कार्यालयाने प्राप्त प्रकरणांची नोंदवही अद्ययावत ठेवून प्रकरण निकाली निघेपर्यंत त्याचा नियमित पाठपुरावा करावा. तसेच प्रत्येक महिनाअखेरीस तालुकास्तरीय एकत्रित अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयास आणि जिल्हास्तरावरील एकत्रित अहवाल दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत विभागीय आयुक्त कार्यालयास सादर करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

कर्मचारी हिताला सर्वोच्च प्राधान्य देत शासन सेवेत कार्यरत तसेच सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवाविषयक प्रश्नांचा नियमानुसार, पारदर्शक व वेळेत निपटारा करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने कार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी यावेळी केले.

# नांदेड येथे पूरपरिस्थितीचा सामना करण्यासाठी धुळे येथील एसडीआरएफची तुकडी तैनात



**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्यात मान्सून कालावधीत संभाव्य पूरपरिस्थितीचा सामना करण्यासाठी मराठवाडा क्षेत्रांसाठी राज्य आपत्ती प्रतिसाद दल, (एसडीआरएफ) धुळे येथील एक तुकडी नांदेड या ठिकाणी १ जुलै २०२६ ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत सुसज्ज साधनसामग्रीसह तैनात करण्याबाबत समादेशक तथा नियंत्रण अधिकारी, (एसडीआरएफ) राज्य आपत्ती प्रतिसाद दल, धुळे यांना शासनाने आदेश दिले होते. त्या आदेशानुसार आर. डी. पवार पो. नि. यांच्यासह ३ अधिकारी व ३३ अंमलदार अशी एक तुकडी १ जुलै रोजी नांदेड येथे तैनात झाली आहे.

मागील चार वर्षांपासून मान्सून कालावधीत संभाव्य पूरपरिस्थितीचा सामना करण्यासाठी मराठवाडा क्षेत्रांसाठी राज्य आपत्ती प्रतिसाद दल, धुळे (एसडीआरएफ) येथील एक तुकडी नांदेड येथे तैनात केली जात आहे. तर नागपूर येथील एक तुकडी गडचिरोली जिल्ह्यात तैनात केली जात आहे. मागील वर्षी मुखेड, देगलूर, धर्माबाद, नायगाव, नांदेड, अर्धापूरसह नांदेड जिल्ह्यातील पूरपीडित भागात या तुकडीने मोठया प्रमाणात शोध व बचाव कार्य केले आहे. मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद मंडळामध्ये अतवृष्टीमुळे निर्माण झालेल्या ऑगस्टमधील पूरपरिस्थितीत एका दिवसामध्ये ३८६ पूरग्रस्तांचे शोध व बचाव कार्य या तुकडीकडून केले आहे. त्याचबरोबर नांदेड सोबतच परभणी, लातूर, हिंगोली या जिल्ह्यातही शोध व बचाव कार्य या तुकडीकडून केले गेलेले आहे. यावर्षीही तुकडी मराठवाडा क्षेत्रासाठी सुसज्ज साहित्यानिशी नांदेड येथे तैनात झालेली आहे.

आज या एसडीआरएफ तुकडीने जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण राहुल कर्डिले यांची भेट घेऊन रिपोर्टिंग केले. या दरम्यान जिल्हाधिकारी नांदेड यांनी त्यांना सतर्क, सुसज्ज राहुन आपत्तीला शिघ्र प्रतिसाद द्यावा. तसेच नांदेड जिल्ह्यातील १६ तालुक्यांतील स्थानिक शोध व बचाव पथक तसेच आपत्तीशी निगडित यंत्रणा/विभागांना प्रशिक्षण देण्याच्याही सुचना दिल्या आहेत.

या वेळी निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण किरण अंबेकर, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी किशोर कुऱ्हे, राज्य आपत्ती प्रतिसाद दल, धुळेचे (एसडीआरएफ) टिम कमांडर आर. डी. पवार सपोनि सुरेश बगाड, सुरेश शंकपाळ, राहुल अवचार, आपत्ती व्यवस्थापनचे सहायक बारकुजी मोरे आदींची उपस्थिती होती.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण नांदेड, पोलीस, मनपा, स्थानिक शोध व बचाव पथक यांच्या समन्वयातून राज्य आपत्ती प्रतिसाद दल धुळे येथील या तुकडीच्या मदतीने या मान्सून कालावधीत पुरपरिस्थितीचा सामना करण्यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे व यातील पुढचा टप्पा स्थानिक शोध व बचाव पथकाच्या कृती प्रशिक्षणाचा घेतला जाणार आहे.

# गुणवंत पावडे यांचे सीए परीक्षेत यश



**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील प्रतिष्ठित व्यक्तिमत्त्व तथा वामनराव पावडे मंगल कार्यालय आणि गंगोत्री स्वीट हॉलचे मालक बालासाहेब किशनराव पावडे (दीपनगर) यांचे सुपुत्र गुणवंत बालासाहेब पावडे यांनी पहिल्याच प्रयत्नात सनदी लेखापाल (सीए) परीक्षा उत्तीर्ण होऊन उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियातर्फे मे २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या सीए अंतिम परीक्षेत त्यांनी हे यश मिळवले. या यशाचे श्रेय त्यांनी आपले आई-वडील, गुरुजन तसेच बहीण डॉ. गायत्री पावडे यांना दिले आहे.

गुणवंत पावडे यांच्या या नेत्रदीपक यशाबद्दल गुणवंत अँड सन्सचे मालक बजरंग पुरी, सौ. रेखाताई पावडे, बालासाहेब पावडे, दिलीप अनगुलवार, गजानन देशमुख, संतोष बोहारे, गणेश मोरे, गंगाधर मच्छे, प्रतापराव पावडे, ब्रह्मानंद अनमोड, गुणवंत शरपे, डॉ. शिवाजी राचेवार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## अवैध व्यवसाय निर्मूलन मोहीम

# अवैध व्यवसाय निर्मूलन मोहीम : नांदेड परिक्षेत्रात दुसऱ्या दिवशी ४५ गुन्हे दाखल, ६८ इसमांविरुद्ध कारवाई; ५० लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**नांदेड (प्रतिनिधी)–** पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी दि. १ ते ३१ जुलै २०२६ दरम्यान, नांदेड परिक्षेत्रात अवैध दारू, गुटखा, मटका, जुगार, अंमली पदार्थ, घातक शस्त्रे इत्यादी विरोधी मोहीम राबविण्याचे निश्चित केले आहे.

या मोहिमेच्या दुसऱ्या दिवशी नांदेड परिक्षेत्रात, गुटखा विक्री करणाऱ्या ३ इसमांविरुद्ध २ गुन्हे दाखल करण्यात आले असून, त्यांच्याकडून १२ लाख २९ हजार १०० रुपये किंमतीचा गुटखा व इतर मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. महाराष्ट्र जुगार कायद्यांतर्गत २८ इसमांविरुद्ध कारवाई करून त्यांचे विरुद्ध ९ गुन्हे दाखल करण्यात आले असून, त्यांच्याकडून ५४ हजार १७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तर अवैध दारू विक्री करणाऱ्या २७ आरोपींविरुद्ध २७ गुन्हे दाखल करून, त्यांच्याकडून ४० हजार ४३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर कारवाई सोबतच कोटपा अन्वये ४, तर इतर अधिनियमाखाली मिळून एकूण ४५ कारवाया करण्यात आल्या असून, यात निष्पन्न झालेल्या आरोपीतांकडून ५० लाख ७४ हजार ५७८ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**‘खबर’ हेल्पलाईनला वाढता प्रतिसाद :** अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलिसांना पोहोचविता यावी, या दृष्टिकोनातून, पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाने ९१ ५० १०० १०० हा मोबाईल क्रमांक असलेली ‘खबर’ नावाची हेल्पलाईन सुरू केली असून, सदर हेल्पलाईनवरून नागरिक अवैध व्यवसायांची अचूक माहिती पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयापर्यंत पोहोचवत आहेत.

नागरिकांनी आपल्या भागातील गुटखा, अंमली पदार्थ व इतर अवैध व्यवसायांची माहिती, सदर क्रमांकावर फोन करून अथवा व्हॉट्सअॅप मेसेजद्वारे पाठवावी व आपल्या भागातील अवैध व्यवसायांना आळा घालण्यासाठी आपला सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे.

# पुस्तकावर बोलू काही... पाऊस... कविता आणि विद्रोहाचा जागर!

## सप्तरंगी साहित्य मंडळाचा रसिकांसाठी नवोपक्रम

**नांदेड (प्रतिनिधी)–** सप्तरंगी साहित्य मंडळ, महाराष्ट्र (नोंदणीकृत) शाखा नांदेडच्या वतीने रविवार, दि. ५ जुलै २०२६ रोजी सकाळी ११.१५ वाजता हॉटेल विसावा येथे पुस्तकावर बोलू काही... आणि पाऊस... कविता... आणि विद्रोह या विशेष नवोपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.




या उपक्रमांतर्गत मारोती भुजंगराव कदम लिखित ‘मास्तर आवगो रे...’ या बालकथासंग्रहावर विशेष चर्चासत्राचे आयोजन केले आहे. भाष्यकार म्हणून प्रा. गोविंद बैलके, सेवानिवृत मुख्याध्यापक बालाजी थोटवे, राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक डॉ. संतोष सेलूकर, सुरेखा महादसवाड यांचा सहभाग राहणार आहे. हे चर्चासत्र डॉ. बी. आर. आंबेडकर फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी नगरसेवक बापूसाहेब गजभारे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. दुपारच्या सत्रात पाऊस...कविता आणि विद्रोह... या विशेष काव्यपौर्णिमेचे आयोजन करण्यात आले असून, काव्यपौणिमेच्या... कविसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी विद्रोही कवी अॅड. संजय भारदे राहणार आहेत.

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात कर्मचाऱ्यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील परीक्षा व इतर विविध विभागांमध्ये दीर्घकाळ उल्लेखनीय सेवा बजावलेले वरिष्ठ लिपीक पांडुरंग वामनराव पावडे आणि सेवक मोहनदास रोहिदास कांबळे यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा विद्यापीठातील अधिसभा सभागृहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन होते.

यावेळी कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार तसेच परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षीय भाषणात डॉ. महाजन यांनी निवृत्त होत असलेल्या दोन्ही कर्मचाऱ्यांच्या प्रामाणिक, कर्तव्यनिष्ठ आणि समर्पित सेवेचा गौरव करत, विद्यापीठाच्या प्रशासकीय जडणघडणीत त्यांच्या योगदानाचे विशेष कौतुक केले.

सेवक मोहनदास रोहिदास कांबळे यांनी अनेक विभागात विविध जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. जगदीश कुलकर्णी यांनी केले, तर राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मारुती गायकवाड यांनी आभार प्रदर्शन केले. या सोहळ्यास विद्यापीठातील विविध विभागांचे प्रमुख, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मराठवाडा ‘लोकविकास’चा आज कार्यक्रम

**नांदेड (प्रतिनिधी)–** नागरी समस्या व जनतेच्या अडचणी सोडविण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या मराठवाडा लोकविकास समन्वय संघर्ष समितीच्या वतीने दि. ५ जुलै रोजी समिती सदस्यांना ओळखपत्र वाटपाचा कार्यक्रम होणार आहे. सायंकाळी ४ वाजता डॉ. वैद्य हॉस्पिटल सभागृह मुथा चौक नांदेड येथे होणाऱ्या कार्यक्रमास सामाजिक कार्यकर्ते डॉ. हंसराज वैद्य, प्रफुल्ल सावंत, अंकुश सोनसळे, संदीप भालेराव हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

मराठवाडा लोकविकास समन्वय संघर्ष समिती ही मागील चार वर्षांपासून नांदेड शहर तसेच संपूर्ण जिल्ह्यात वैयक्तिक, सामाजिक तथा जनहिताचे सार्वजनिक प्रश्न घेऊन अन्याय-अत्याचार विरोधी लढ्याच्या कार्यात सक्रिय कार्यशील आहे. मागील चार वर्षात समितीच्या माध्यमातून शहरातील विविध प्रशासकीय स्तरावरील शिक्षण, आरोग्य, शहर व परिसर विकास, महावितरण, ज्येष्ठ नागरिक, कामगार, शेतकरी, कष्टकरी यांच्या अडीअडचणी दूर करण्यासाठीच्या विविध प्रश्नांवर अग्रेसर राहून कार्य करत आहे. दिवसेंदिवस समितीचा कार्य व्याप वाढत आहे तद्वतच नवनवीन समस्यांसह नागरिक समितीच्या कामकाजात सहभागी होत आहेत. समिती ही जात-पात-धर्म-वर्ण-राजकारण विरहित लोकमान्य सामाजिक संघटन आहे.

आपल्या कार्याचा भाग व समिती सदस्यांची वेगळी ओळख असण्यास्तव समितीच्यावतीने सभासदांना ओळखपत्र वाटप करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन समितीचे मुख्य समन्वयक के. के. जांबकर, स्थायी समिती सदस्य बंडोपंत कुंटूरकर, विजय जोशी, कमलाकर जोशी, कृष्णा उमरीकर, डी. एम. पाटील, माधवराव कल्याणकर, जगन पांचाळ, राजमल बाकलीवाल, डॉ. मुकुंद पांडे, शिवकांत स्वामी, एच. आर. पेद्देवाद, राजेश माने, रघुनाथ सरदेशपांडे, सुरेश बिंदू, गंगाधर श्रीरामवार, नारायण घोगरे, जी. टी. शिंदे, सखाराम कुलकर्णी, रमेश यन्नावार,आर. बी. दुडके, एस. व्ही. कंठाळे, माणिक डहाळे, दीपक आडगावकर यांनी केले आहे.

# पंचायत समिती मुदखेड येथे कृषी दिन उत्साहात साजरा

**मुदखेड (प्रतिनिधी)–** पंचायत समिती मुदखेड येथे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा हरीत क्रांतीचे जनक कै. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त कृषी दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम मान्यवरांनी स्व. वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन केले. त्यानंतर मान्यवरांचा सत्कार व कृषिविषयक योजना यशस्वीपणे राबविणाऱ्या उपक्रमशील शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात आला.




या कार्यक्रमाचे अध्यक्ष पं. स. मुदखेडचे गट विकास अधिकारी शेखर देशमुख हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून कृषी विज्ञान केंद्र पोखर्णीचे कृषी तज्ज्ञ डॉ. अंबोरे हे होते. कार्यक्रमाची सुरुवात कृषी विस्तार अधिकारी अरूण घोडसे पाटील यांच्या पहाडी आवाजातील महाराष्ट्र गीताने झाली तर प्रास्ताविक कृषी विस्तार अधिकारी एस. एम. पाटील यांनी केले.

या कार्यक्रमात कृषी तज्ज्ञ डॉ. अंबोरे, मुदखेडच्या तालुका कृषी अधिकारी डॉ. अमरज्योती गच्चे मॅडम, गटविकास अधिकारी शेखर देशमुख यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृषी विस्तार अधिकारी अरुण घोडसे पाटील यांनी केले तर आभार सांख्यिकी विस्तार अधिकारी डी. के. उपलंचवार यांनी मानले. या कार्यक्रमास पं. स. चे कृषी अधिकारी व्ही.एस. निरडे, तालुका कृषी अधिकारी हिलालपुरे, डॉ. शिंदे पा. नागेलीकर यांच्यासह पत्रकार पंचायत समिती येथील कर्मचारी व शेतकरी उपस्थित होते.

# ‘यशवंत’ मध्ये एनसीसी प्रमाणपत्र वितरण सोहळा उत्साहात संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)–** यशवंत महाविद्यालयात एनसीसी कक्षाच्या वतीने कॅडेट्सना बी आणि सी प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. सोहळ्याचे अध्यक्षस्थान माजी प्र-कुलगुरू प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे यांनी भूषविले. प्रमुख अतिथी ५२ महाराष्ट्र बटालियन एनसीसीचे सुभेदार दत्तात्रेय उगले, नायब सुभेदार शिवाजी हरंगुले, नागरगोजे व महिपाल यांची उपस्थिती होती.

सुभेदार दत्तात्रेय उगले यांनी एन.सी.सी. कडेटकडे शिस्त ही महत्त्वाची शिदोरी असून जीवनाला महत्त्वाचे वळण देणारी आहे. आयुष्य हे संघर्षमय असून, निर्भीडपणे प्रत्युत्तर देणे गरजेचे असल्याचे मनोगत व्यक्त केले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे यांनी ते स्वतः एनसीसी कॅडेट होते असे सांगून एनसीसीमुळे आयुष्यामध्ये विशिष्ट शिस्त निर्माण झाली आणि पुढील सर्व आयुष्यातील वाटचाल शिस्तीमुळे सहज आणि सुगम झाली. जीवनातील विविध प्रश्नांना समर्थपणे व निर्भयतेने सामोरे जाण्याचे धाडस निर्माण झाले. आयुष्यामध्ये कधी नकारात्मकता व निराशा निर्माण झाली नसल्याचा अनुभव व्यक्त केला. आधुनिक तंत्रज्ञानात्मक युगात विद्यार्थ्यांनी शिस्तीसोबतच विविध कौशल्य आत्मसात करून विकसित करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे नियोजन एनसीसी कक्षाचे लेफ्टनंट प्रा. श्रीकांत सोमठाणकर यांनी केले. प्रारंभी प्रस्तावना जीसीआय प्रा. प्रियंका सिसोदिया यांनी केली तसेच शेवटी आभार देखील मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रसिद्धी समन्वयक डॉ. अजय गव्हाणे, प्रा. ओमप्रकाश गुंजकर, प्रबंधक संदीप पाटील, अधीक्षक कालिदास बिरादार व गजानन पाटील, प्रशांत मुंगल यांनी सहकार्य केले.

# यूपीएससी मुख्य परीक्षा व मुलाखत पूर्वतयारीसाठी ‘अमृत’ संस्थेतर्फे आर्थिक सहाय्य योजना; ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), नांदेड या महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्थेमार्फत राज्यातील खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील आणि अमृतच्या लक्षित गटातील उमेदवारांसाठी एक महत्त्वपूर्ण योजना जाहीर करण्यात आली आहे. संघ लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा मुख्य परीक्षा आणि मुलाखत पूर्वतयारीसाठी प्रोत्साहनपर अर्थसहाय्य योजना सन २०२६-२७ अंतर्गत पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

**योजनेचा मुख्य तपशील व मिळणारे आर्थिक लाभ:**

मुख्य परीक्षा पूर्वतयारीसाठी: सन २०२६-२७ मध्ये संघ लोकसेवा आयोगाची नागरी सेवा पूर्व परीक्षा-२०२६ उत्तीर्ण झालेल्या पात्र उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी रु. पन्नास हजार रुपये इतके प्रोत्साहनपर अर्थसहाय्य दिले जाईल.

**मुलाखत पूर्वतयारीसाठी:** मुख्य परीक्षा उत्तीर्ण होऊन मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना पूर्वतयारीसाठी रु. पंचवीस हजार रुपये इतके अर्थसहाय्य प्रदान करण्यात येणार आहे.

**पात्रता आणि अटी:** उत्पन्न मर्यादा: अर्ज करणाऱ्या उमेदवारांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांपेक्षा कमी असणे आवश्यक आहे.

लक्षित प्रवर्ग / जाती: खुल्या प्रवर्गातील ज्या जातींना कोणत्याही शासकीय संस्था किंवा महामंडळाचा लाभ मिळत नाही, अशा २५ जातींमधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक या योजनेसाठी पात्र आहेत.

# रोटरी क्लब ऑफ नांदेडतर्फे वृक्षारोपण व भव्य रक्तदान शिबिर



**नांदेड (प्रतिनिधी)–** रोटरी क्लब ऑफ नांदेड व रोटरी क्लब नंदीग्राम नांदेडतर्फे दि. १ जुलै २०२६ रोजी कृषी दिवस, डॉक्टर दिवस, सीए दिवस व रोटरीचे नवीन वर्षानिमित्त सायन्स कॉलेज क्रीडांगण मैदान नांदेड येथे वेगवेगळ्या प्रकारचे एकूण ६० रोपांचे वृक्षारोपण करण्यात आले.

या वृक्षांचे संगोपन करण्याची जबाबदारी रो. नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. प्रवीण पाटील यांनी स्वीकारली आहे. तसेच १ जुलै रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत रक्तदान शिबीर घेण्यात आले. या शिबिरामध्ये एकूण ३० रक्तदात्यांनी रक्तदान केले. ज्या ३० जणांनी रक्तदान केले आहे त्या सर्वांचे रोटरी क्लब ऑफ नांदेडकडून १ लाख रुपयांचा विमा मोफत व प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

तसेच नांदेडमधील डॉक्टर व चार्टर्ड अकाउंटंट यांचा सत्कार करण्यात येणार आहे. या वृक्षारोपण व रक्तदान शिबिरासाठी रोटरी क्लब ऑफ नांदेडचे सर्व पदाधिकारी तसेच अध्यक्ष रो. सुरेश अंबुलगेकर व सचिव रो. प्रशांत गुर्जर यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला.

# चंदेरी

## अभिनेता अली फजलची विशेष मुलाखत

# मुलीचा बाबा होणे माझे भाग्य; तिच्या गरजा पूर्ण करता याव्यात, हीच रोज प्रार्थना...



**अभिनेता अली फजल सध्या 'राख' या वेब मालिकेमुळे चर्चेत आहेत. लवकरच ते 'बंटवारा १९४७', 'मिर्झापूर' आणि 'लस्ट स्टोरीज'मध्येही दिसणार आहेत. एका विशेष मुलाखतीत त्यांनी आगामी चित्रपट, मुलीच्या जन्मानंतर आयुष्यात झालेला बदल, सामाजिक विषयांवर भूमिका मांडण्याची त्यांची भूमिका, जातीय भेदभावाचे अनुभव आणि समाजातील गुन्हेगारीविषयी मते व्यक्त केली.**

**प्रश्न : 'बंटवारा १९४७'मधील तुमच्या भूमिकेबद्दल काय सांगाल?**

**अली फजल :** या चित्रपटात माझी भूमिका फार मोठी नाही, पण भूमिकेचा आकार माझ्यासाठी कधीच महत्त्वाचा नसतो. मी ज्या कथेत आणि ज्या संघासोबत काम करतो, त्याला अधिक महत्त्व देतो. सनी देओल यांच्यासारख्या ज्येष्ठ अभिनेत्यासोबत काम करण्याची संधी मिळणे हा मोठा अनुभव आहे. हा चित्रपट आमिर खान यांच्या निर्मितीखाली तयार होत आहे. त्यामुळे त्याच्या प्रदर्शनाची मी आतुरतेने वाट पाहत आहे. मी स्वतःला एका ठरावीक प्रकारच्या भूमिकांमध्ये मर्यादित ठेवू इच्छित नाही. 'मिर्झापूर' चित्रपटात प्रेक्षकांना परिचित कलाकारांसोबत एक वेगळाच सिनेमॅटिक अनुभव मिळेल.

**प्रश्न : मुलगी जुनैराच्या जन्मानंतर आयुष्यात काय बदल झाले?**

**अली फजल :** मुलीचा बाबा होणे हे माझे मोठे भाग्य आहे. दररोज देवाकडे एकच प्रार्थना करतो की, एक पालक म्हणून तिची योग्य काळजी घेता यावी आणि तिच्या सर्व गरजा पूर्ण करता याव्यात. मुलीच्या जन्मानंतर माझ्यात प्रचंड बदल झाला आहे. लोक विचारतात, 'मुलीसाठी काय करणार?' पण माझ्या मते मुलांना चांगले संगोपन, शिक्षण आणि आवश्यक गोष्टी देणे हे पालक म्हणून आपले कर्तव्यच आहे. त्यात विशेष काही नाही. अनावश्यक चर्चा करण्यापेक्षा काम करणे, मुलांना योग्य संस्कार देणे आणि त्यांना चांगले शिक्षण मिळवून देणे अधिक महत्त्वाचे आहे.

**प्रश्न : तुमची पत्नी ऋचा चड्ढा सामाजिक विषयांवर स्पष्टपणे भूमिका मांडते. तुम्ही मात्र फारसे बोलत नाही. याचे कारण काय?**

**अली फजल :** प्रत्येक माणूस इच्छाशक्ती असेल तर काहीही करू शकतो. मलाही हवे तर प्रत्येक विषयावर बोलता येईल. पण मला वाटते की माझे विचार मी माझ्या कामातून अधिक प्रभावीपणे मांडू शकतो. कोणत्याही विषयाची पूर्ण माहिती आणि समज नसताना सार्वजनिकपणे भाष्य करणे मला योग्य वाटत नाही.

**प्रश्न : कलाकारांनी प्रत्येक सामाजिक विषयावर भूमिका मांडलीच पाहिजे, असे तुम्हाला वाटते का?**

**अली फजल :** कलाकार म्हणून आमच्यावर काही प्रमाणात जबाबदारी असते, कारण आम्हीही समाजाचाच भाग आहोत. समाजाकडून शिकतो आणि त्याच समाजाचे प्रतिबिंब चित्रपट व कथांमधून प्रेक्षकांसमोर मांडतो. मात्र प्रत्येक विषयावर, प्रत्येक वेळी सार्वजनिक भूमिका मांडणे आवश्यक आहे, असे मला वाटत नाही. पूर्वी सोशल मीडियाचे अस्तित्व नव्हते. त्यामुळे कलाकारांकडून अशा अपेक्षाही कमी होत्या. आज मात्र प्रत्येक विषयावर मत व्यक्त करण्याची अपेक्षा केली जाते. त्यात काही गैर नाही, पण प्रत्येकाची अभिव्यक्ती करण्याची पद्धत वेगळी असते. माझ्यासाठी माझे काम हीच माझी सर्वात प्रभावी अभिव्यक्ती आहे.

**प्रश्न : 'राख'मध्ये तुम्ही जातीय भेदभावाचा सामना करणाऱ्या पात्राची भूमिका साकारली आहे. प्रत्यक्ष आयुष्यात असे अनुभव आले आहेत का?**

**अली फजल :** होय, अशा प्रकारच्या अनुभवांना जवळपास प्रत्येकाने कधी ना कधी सामोरे गेले आहे. मीही गेलो आहे. आपल्या समाजात आजही भेदभाव खोलवर रुजलेला आहे. शाळांमधील छळवणुकीची सुरुवातही अनेकदा घरातूनच होत असते. आजही अनेक घरांमध्ये घरकाम करणाऱ्या व्यक्तींना वेगळी वागणूक दिली जाते. त्यांच्यासाठी स्वतंत्र भांडी ठेवली जातात. मुलगा-मुलगी असा भेद केला जातो. मुलांना चांगले शिक्षण, तर मुलींना कमी संधी दिल्या जातात. एका प्रकारचा भेदभाव संपला, तरी लोक दुसऱ्या कारणावरून भेदभाव करतात. त्यामुळे खरा बदल शिक्षण आणि सामाजिक जागृतीतूनच होऊ शकतो.

**प्रश्न : गुन्हेगारी रोखण्यासाठी काय बदल आवश्यक आहेत?**

**अली फजल :** बहुतांश गंभीर गुन्हे हे पीडितांच्या जवळच्या व्यक्तींकडूनच घडतात. त्यामुळे सर्वात आधी मानसिकतेत बदल होणे गरजेचे आहे. भ्रष्ट आणि विकृत विचारसरणी समाजाला आतून पोखरत आहे. आपण विचार बदलले नाहीत, तर समस्या वेगवेगळ्या स्वरूपात समोर येत राहतील. आज मोबाईल फोन आणि डिजिटल जगामुळे संपूर्ण पिढी बदलली आहे. आपण थांबून ऐकणे, विचार करणे आणि इतरांच्या भावना समजून घेणे कमी केले आहे. हीच आजची सर्वात मोठी समस्या आहे.

**प्रश्न : विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय प्रकल्पांमध्ये काम केल्यानंतर अभिनेता आणि माणूस म्हणून काय शिकलात?**

**अली फजल :** प्रत्येक भूमिका माझ्यासाठी मानवी स्वभाव अधिक खोलवर समजून घेण्याची संधी असते. मी प्रत्येक वेळी एखाद्या सामान्य माणसाच्या मनात आणि त्याच्या परिस्थितीत शिरण्याचा प्रयत्न करतो. तेव्हा लक्षात येते की प्रत्येक कथेमागे एक खरा माणूस असतो. त्याचे संघर्ष, भावना आणि आयुष्याच्या अनेक बाजू असतात. 'राख'मधील माझे पात्रही असेच आहे. तो एक सामान्य, शिक्षण घेऊन पोलीस दलात दाखल झालेला अधिकारी आहे. जबाबदाऱ्या, मर्यादा आणि संघर्ष यांच्यात काम करत असताना एका गुंतागुंतीच्या प्रकरणामुळे त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू उलगडत जातात. एखाद्या प्रभावी भूमिकेचे संपूर्ण श्रेय मी कधीच स्वतःला देत नाही. लेखक आणि दिग्दर्शक पात्राची मजबूत पायाभरणी करतात. कलाकार म्हणून आम्ही त्यात स्वतःचे अनुभव आणि भावना मिसळून त्या पात्राला अधिक जिवंत करण्याचा प्रयत्न करतो.

## अभिनेते शेखर सुमन यांची विशेष मुलाखत

# 'पदाची प्रतिष्ठा जपतो; पण जिथे चूक असेल, तिथे बोटही ठेवतो'

अभिनेते शेखर सुमन सध्या त्यांच्या 'शेखर टुनाईट' या कार्यक्रमामुळे विशेष चर्चेत आहेत. सामाजिक आणि राजकीय विषयांवर निर्भीडपणे भाष्य करणाऱ्या या कार्यक्रमाला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. एका विशेष मुलाखतीत त्यांनी निर्भीडपणे मत मांडण्याची गरज, सरकारला प्रश्न विचारण्याचा नागरिकांचा अधिकार, आजची विनोदी संस्कृती, स्टँडअप कॉमेडी, मुलगा अध्ययन सुमनचा प्रवास आणि दिवंगत मुलगा आयुषच्या आठवणी यावर मनमोकळेपणाने संवाद साधला.

**प्रश्न : आजच्या काळात सरकार किंवा व्यवस्थेविरोधात बोलणे सोपे राहिलेले नाही. तुम्हाला भीती वाटत नाही का?**

**शेखर सुमन :** हो, आज अनेकांच्या मनात भीती आहे. पण भीती का बाळगायची? आपण काही गुन्हा करत नाही किंवा कोणालाही शिवीगाळ करत नाही. माझे नेहमीच मत आहे की भाषा सभ्य आणि सुसंस्कृत असावी. पंतप्रधानांना कितीही कठोर प्रश्न विचारा, पण त्यांच्या पदाचा मान राखलाच पाहिजे. आम्ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दल बोलताना त्यांचा पूर्ण आदर ठेवतो. मात्र जिथे चूक दिसते, तिथे ती दाखवायलाही मागेपुढे पाहत नाही. कारण त्यांना आम्हीच निवडून दिले आहे. मतदान करून सरकार निवडले असल्याने चुकीच्या गोष्टींबाबत प्रश्न विचारणे हा नागरिक म्हणून आमचा अधिकार आहे. आमचा विरोध कोणत्याही व्यक्तीला नाही. ना मोदीजींना, ना राहुल गांधींना. आमचा विरोध चुकीच्या व्यवस्थेला आहे. सत्तेच्या सर्वोच्च स्थानावर असलेल्या व्यक्तींवर अधिक जबाबदारी असते. त्यामुळे त्यांना जाब विचारणे आवश्यक आहे. या भूमिकेला लोकांचाही भरभरून प्रतिसाद मिळत आहे.

**प्रश्न : 'शेखर टुनाईट' सुरू करण्यामागील प्रवास आणि आव्हाने कोणती होती?**

**शेखर सुमन :** प्रत्येक गोष्टीची योग्य वेळ असते. त्या वेळेनुसारच गोष्टी घडतात. मी अनेक कामांमध्ये व्यस्त होतो. फिल्म अकादमी सुरू केली, 'साहिर-अमृता' या नाटकाचे १२५ प्रयोग केले. याशिवाय चार चित्रपट आणि वेबसीरिजचे चित्रीकरण सुरू होते. माझा मुलगा अध्ययन म्हणाला की, लोकांकडून या कार्यक्रमासाठी मोठी मागणी आहे आणि आता तो सुरू करायलाच हवा. त्यानंतर आम्ही ठरवले की हा केवळ विनोदी कार्यक्रम नसणार. माझ्यासाठी हा एक प्रकारचा सामाजिक संवाद आहे. प्रेक्षकांसोबत देशातील सामाजिक आणि राजकीय विषयांवर चर्चा करण्याचा हा प्रयत्न आहे.

**प्रश्न : हा कार्यक्रम टीव्हीवर न आणता यूट्यूबवरच का आणला?**

**शेखर सुमन :** सर्वात मोठे आव्हान योग्य व्यासपीठ निवडण्याचे होते. आज बहुतेक टीव्ही वाहिन्यांमध्ये असा कार्यक्रम करण्याचे धाडस नाही. अनेक ठिकाणी अभिव्यक्तीवर मर्यादा आहेत. ओटीटीवरही आता 'हे बोलू नका, ते बोलू नका' अशी बंधने येऊ लागली आहेत. म्हणून आम्ही यूट्यूबची निवड केली. येथे कोणत्याही दबावाशिवाय, पूर्ण स्वातंत्र्याने आपले विचार मांडता येतात.

**प्रश्न : आजच्या स्टँडअप कॉमेडीबद्दल तुमचे मत काय आहे?**

**शेखर सुमन :** मी स्वतःला आणि माझ्या कार्यक्रमाला उथळ विनोदांपासून जाणीवपूर्वक दूर ठेवले आहे. पूर्वी कॉमेडी शोचा परीक्षक असताना लोक विचारायचे, 'तुम्ही हसत का नाही?' पण केवळ उथळ किंवा मूर्खपणाच्या गोष्टींवर मला हसू येत नाही. आज भारतातील विनोदाची पातळी खूप खालावली आहे. मुलगा-मुलगी बनून अभिनय करणे, कलाकारांची नक्कल करणे किंवा



महिलांवर, पत्नीवर किंवा व्यक्तीच्या दिसण्यावर विनोद करणे म्हणजे हास्य नव्हे. माझा कार्यक्रम सुशिक्षित आणि विचार करणाऱ्या प्रेक्षकांसाठी आहे. ज्यांना साहित्य, राजकारण, समाज आणि संस्कृतीची जाण आहे, अशा लोकांशी संवाद साधण्याचा हा प्रयत्न आहे.

**प्रश्न : तुमचा मुलगा अध्ययन सुमन या कार्यक्रमाचा निर्माता आणि दिग्दर्शक आहे. त्याबद्दल काय वाटते?**

**शेखर सुमन :** एका वडिलांसाठी ही अतिशय अभिमानाची बाब आहे. अध्ययनने या कार्यक्रमाचे सादरीकरण अत्यंत दर्जेदार पद्धतीने केले आहे. आमच्यातील ही भागीदारी माझ्यासाठी खूप सुंदर अनुभव आहे.

**प्रश्न : अध्ययनला चित्रपटसृष्टीत अपेक्षित यश मिळाले नाही. त्याबद्दल काय सांगाल?**

**शेखर सुमन :** सूर्य मावळतो, पण पुन्हा उगवतो. आयुष्यातील संघर्ष माणसाला अधिक सक्षम बनवतो. अध्ययनने हा कार्यक्रम उभा केला, फिल्म अकादमी सुरू केली, आधुनिक व्हीएफएक्स आणि एआय स्टुडिओ उभारला, स्वतःचा कपड्यांचा ब्रँड सुरू केला आणि स्वतःचे चित्रपटही तयार करत आहे. त्याची योग्य वेळ आता आली आहे. बॉबी देओल यांनाही उशिरा मोठे यश मिळाले. अध्ययन अजून तरुण आहे. संघर्षामुळे तो अधिक परिपक्व झाला आहे.

**प्रश्न : जर अध्ययनला लहान वयातच मोठे यश मिळाले असते तर?**

**शेखर सुमन :** १९ व्या वर्षी तो मोठा स्टार झाला असता, तर कदाचित भरकटला असता. त्यावेळी त्याच्यात आजची परिपक्वता नव्हती. अपयश, वेदना आणि संघर्ष माणसाला घडवतात. आज तो अधिक समजूतदार झाला आहे. आता तो जे काही करतो, ते अत्यंत प्रभावी असते. मला खात्री आहे की, आता तो मागे वळून पाहणार नाही. पूर्वी त्याच्या करिअरची चिंता वाटायची. पण आता माझ्या पत्नीने प्रेमाने सांगितले की, 'आपल्या मुलाने तुझे सगळे कष्ट फेडले.'

**प्रश्न : दिवंगत मुलगा आयुषच्या आठवणी आजही मनात आहेत का?**

**शेखर सुमन :** मुलाला गमावण्याइतके मोठे दुःख दुसरे असू शकत नाही. आयुष केवळ ११ वर्षांचा असताना हृदयविकारामुळे आम्हाला सोडून गेला. आयुष्यात कितीही यश मिळाले तरी त्या दुःखाची भरपाई होऊ शकत नाही. तो आमच्यासाठी आजही प्रेरणा आहे. मला वाटते, तो कुठेतरी देवदूतासारखा आमची काळजी घेत असतो.

**प्रश्न : पुढील आयुष्यातील सर्वात मोठे स्वप्न कोणते?**

**शेखर सुमन :** आयुषच्या स्मरणार्थ मला मुलांसाठी एक विशेष रुग्णालय उभारायचे आहे. हृदयविकाराने ग्रस्त असलेल्या मुलांवर तेथे पूर्णपणे मोफत उपचार व्हावेत, हे माझे मोठे स्वप्न आहे. देवाने हे स्वप्न पूर्ण केले, तर आयुष्यात मला आणखी काहीच नको.



## फराह खान अलींचा खुलासा

# बॉबी देओल 17 वर्षांचा; आम्ही हातात हात घ्यायचो, पत्रे लिहायचो'



**प्रसिद्ध दागिन्यांच्या डिझायनर फराह खान अली यांनी अभिनेता बॉबी देओल यांच्यासोबतच्या किशोरवयातील मैत्री आणि आकर्षणाबद्दल पहिल्यांदाच सविस्तर भाष्य केले आहे. एका मुलाखतीत त्यांनी सांगितले की, त्या दोघे बालपणापासूनचे मित्र होते आणि एकमेकांबद्दल आकर्षणही होते. मात्र, त्यांचे नाते आजच्या अर्थाने 'डेटिंग' नव्हते, असे त्यांनी स्पष्ट केले.**

फराह खान अली म्हणाल्या, की आम्ही बालपणापासूनचे 'स्वीटहार्ट' होतो. मला बॉबीवर खूप आकर्षण होते आणि त्यालाही माझ्याबद्दल तितकेच आकर्षण होते. आम्ही हातात हात घ्यायचो, एकमेकांना पत्रे लिहायचो. एवढेच. त्या काळात आजसारखी डेटिंगची संकल्पना नव्हती. त्या पुढे म्हणाल्या, 'त्या वेळी मी १६ वर्षांची होते, तर बॉबी १७ वर्षांचा होता. ही जवळपास ४० वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. त्या काळातील आयुष्य आजच्या पिढीपेक्षा पूर्णपणे वेगळे होते.

### आजही कायम आहे घट्ट मैत्री

फराह यांनी सांगितले की, किशोरवयातील त्या भावना काळाच्या ओघात मैत्रीत रूपांतरित झाल्या आणि आजही त्यांचे बॉबी देओल यांच्याशी अतिशय जवळचे संबंध आहेत. त्या म्हणाल्या, की आज बॉबी माझ्या सर्वात जवळच्या मित्रांपैकी एक आहे. त्याची पत्नी तान्या देओल हिच्याशीही माझे अतिशय प्रेमाचे आणि जिव्हाळ्याचे नाते आहे. ते दोघे माझ्यासाठी कुटुंबासारखे आहेत. त्यांच्या आनंदासाठी मी काहीही करू शकते.' बॉबी देओल आणि अभिनेत्री नीलम कोठारी यांच्यामुळे स्वतःच्या आणि बॉबीच्या नात्यात दुरावा आला होता, या चर्चांचेही फराह यांनी खंडन केले. त्या म्हणाल्या, 'हे अजिबात खरे नाही. नीलम माझी अतिशय जवळची मैत्रीण आहे. ती माझ्या आणि बॉबीनंतर त्याच्या आयुष्यात आली. त्यामुळे तिने आम्हाला वेगळे केले, हे म्हणणे पूर्णपणे चुकीचे आहे.'

### बॉबी, नीलमचेही होते प्रेमसंबंध

बॉबी देओल आणि नीलम कोठारी यांनी बॉलिवूडमध्ये पदार्पण करण्यापूर्वी सुमारे पाच वर्षे एकमेकांना डेट केले होते. १९९० च्या दशकाच्या सुरुवातीला दोघांनी परस्पर संमतीने वेगळे होण्याचा निर्णय घेतला होता. नीलम यांनी यापूर्वी एका मुलाखतीत सांगितले होते की, 'स्टार पत्नी' म्हणून जगण्याबाबत असलेल्या अनिश्चिततेमुळे त्यांनी हे नाते संपवण्याचा निर्णय घेतला होता. त्यांच्या मते, या विभक्त होण्यामागे कुटुंबीयांचा विरोध किंवा विश्वासघात यांसारखे कोणतेही कारण नव्हते. दरम्यान, फराह खान अली या सुजैन खान यांच्या बहिणी आहेत. सुजैनचा अभिनेता हृतिक रोशन याच्याशी २०१४ मध्ये परस्पर संमतीने घटस्फोट झाला होता.

# सलमान खानचा 'मातृभूमी' चित्रपट पुन्हा अडचणीत? सेन्सॉर प्रमाणपत्र अद्याप प्रलंबित असल्याची चर्चा

**अभिनेता सलमान खान याचा बहुचर्चित 'मातृभूमी' हा चित्रपट पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. माध्यमांतील वृत्तांनुसार, चित्रपटाला अद्याप केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळाकडून (CBFC) प्रमाणपत्र मिळाले नसल्याची चर्चा असून, त्यामुळे ऑगस्टमधील संभाव्य प्रदर्शनावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मात्र, या संदर्भात चित्रपटाच्या निर्मात्यांकडून किंवा सेन्सॉर बोर्डाकडून कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही.**

यापूर्वी हा चित्रपट एप्रिलमध्ये प्रदर्शित होणार असल्याचे सांगितले जात होते. त्यानंतर स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर ऑगस्टमध्ये प्रदर्शित होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली होती. मात्र, अद्याप अधिकृत प्रदर्शनाची तारीख जाहीर करण्यात आलेली नाही. वृत्तांनुसार, चित्रपटाला अद्याप सेन्सॉर बोर्डाकडून मंजुरी मिळालेली नसली तरी चित्रपट रोखण्यात आलेला नाही. प्रमाणपत्र मिळविण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे ऑगस्टमधील प्रदर्शनही पुढे ढकलले जाऊ शकते, अशी शक्यता वर्तवली जात आहे. दिग्दर्शक अपूर्व लाखिया यांच्या दिग्दर्शनाखाली तयार झालेल्या या चित्रपटात सलमान खानसोबत अभिनेत्री चित्रांगदा सिंग, अभिलाष चौधरी आणि अंकुर भाटिया यांच्या प्रमुख भूमिका आहेत. चित्रपटाचे संगीत हिमेश रेशमिया यांनी दिले आहे.

### नावावरून आधीच झाला होता वाद

या चित्रपटाचे मूळ नाव 'बॅटल ऑफ गलवान' असे होते. मात्र, त्यावरून वाद निर्माण झाल्यानंतर निर्मात्यांनी चित्रपटाचे नाव बदलून 'मातृभूमी' असे ठेवले. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये चित्रपटाचा टीझर प्रदर्शित झाल्यानंतर चीनमधील सोशल मीडिया प्लॅटफॉर्म Weibo वर त्याला विरोध करण्यात आला होता. काही चिनी वापरकर्त्यांनी गलवान खोऱ्यातील घटनांचे चुकीचे चित्रण केल्याचा आरोप केला होता. त्यानंतर केवळ चित्रपटाचे नावच नव्हे, तर पटकथा आणि काही दृश्यांमध्येही बदल करण्यात आल्याचे वृत्त समोर आले होते. सध्या मात्र चित्रपटाच्या प्रदर्शनाबाबत किंवा सेन्सॉर प्रक्रियेबाबत निर्माते आणि CBFC यांनी कोणतेही अधिकृत स्पष्टीकरण दिलेले नाही. त्यामुळे चित्रपट नेमका कधी प्रदर्शित होणार, याबाबत प्रेक्षकांना आणखी प्रतीक्षा करावी लागणार आहे.

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




## कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवून गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवा -एस. पी. डॉ. निलाभ रोहन



**नांदेड (प्रतिनिधी)–** पोलीस अधीक्षक पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी पोलीस उपविभागांतर्गत प्रत्येक पोलीस ठाण्याची तपासणी सुरू केली आहे. आपल्या हद्दीमध्ये कायदा व सुव्यवस्था बाधित होणार नाही याची काळजी घेत गुन्हे नियंत्रणात आणून प्रलंबित गुन्ह्यांचे निराकरण तातडीने करा, अवैध धंदे चालू देऊ नका, अशा कडक सूचना डॉ. निलाभ रोहन यांनी सोनखेड पोलीस ठाण्यात तपासणीसाठी आले असता यावेळी अधिकारी, कर्मचाऱ्यांना दिल्या.

नांदेडपासून १५ किलोमीटर अंतरावर असलेल्या सोनखेड पोलीस ठाण्याला डॉ. निलाभ यांनी नुकतीच भेट दिली. यावेळी सहायक पोलीस निरीक्षक भागवत नागरगोजे यांनी त्यांचे स्वागत केले. नागरगोजे यांनी पोलीस ठाण्यातील आपल्या सर्व सहकाऱ्यांसोबत पदभार घेतल्यापासून ३ जुलैपर्यंत अवैध वाळू, गौण खनिज वाहतुकीचे पाच गुन्हे दाखल करून जवळपास दोन कोटी २६ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल तसेच अवैध देशी व विदेशी दारूचे १९ गुन्हे दाखल करून ३२ हजार २४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी गुन्हेगारांना अटक केल्याचेही त्यांनी सांगितले.

पोलीस ठाण्यातील कामकाज कशा पद्धतीने चालते याची माहिती पोलीस अधीक्षकांनी घेतली. यावेळी अधिकारी, कर्मचाऱ्यांना त्यांनी कडक शब्दात सूचना दिल्या. आपल्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंदे चालणार नाहीत याची दक्षता घ्या, ज्यात अवैध वाळू उपसा, गौण खनिज, जुगार, मटका, क्लब यासोबतच अवैध दारू विक्री या धंद्यांचा समावेश असणार आहे. पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नागरिकांशी सुसंवाद ठेवून त्यांना पोलीस आपले मित्र आहेत ही भावना त्यांच्या मनात रुजवा, कुणाच्याही आमिषाला किंवा दडपणाला बळी पडू नका, अशा सूचनाही डॉ. निलाभ यांनी सूचना दिल्या.

पोलीस ठाण्याची स्वच्छता नीटनेटकी ठेवा, प्रलंबित असलेले गुन्हे निकाली काढा, पोलीस ठाण्यात आलेल्या प्रत्येक पीडितांना समाधान होईल असे त्यांच्याशी वर्तन ठेवा, कर्मचाऱ्यांनी कुठलीही नशा पाणी न करता वर्दीचा गुन्हेगारावर धाक राहील असे वर्तन करा अशा सूचनाही डॉ. निलाभ यांनी दिल्या आहेत.

## नांदेड जिल्हा बँकेकडून ११,१६६ कर्जदारांचा तपशील पोर्टलवर अपलोड

### ९५ कोटी ९२ लाखांची थकबाकी

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या अंमलबजावणी अंतर्गत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने जिल्ह्यातील ११ हजार १६६ थकीत कर्जदार शेतकऱ्यांचा तपशील शासनाच्या ऑनलाईन कर्जमुक्ती पोर्टलवर अपलोड केला असल्याची माहिती जिल्हा उपनिबंधक शाहुराज हिरे यांनी दिली.

योजनेची प्रभावी, पारदर्शक आणि वेळेत अंमलबजावणी व्हावी, यासाठी जिल्हा मध्यवर्ती बँकेला पात्र कर्जदारांची माहिती पोर्टलवर अपलोड करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार शासनाने निश्चित केलेल्या निकषांनुसार लेखापरीक्षकांनी तपासणी करून पात्र ठरविलेल्या ११,१६६ शेतकऱ्यांची माहिती पोर्टलवर नोंदविण्यात आली आहे.

या पात्र शेतकऱ्यांवरील थकीत कर्जाची एकूण रक्कम ९५ कोटी ९२ लाख रुपये इतकी आहे. शासनाची पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याबरोबरच त्यांचा आत्मविश्वास वाढवून शेतीला नवसंजीवनी देण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण तसेच ग्रीस्टॅक नोंदणी वेळेत पूर्ण करावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## नीट पेपर फुटीविरोधातील धरणे आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** देशातील लाखो विद्यार्थ्यांच्या हितासाठी दिल्ली येथील जंतर-मंतरवर सुरू असलेल्या कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनाला नांदेड येथून विद्यार्थी व संविधान बचाव कृती समितीने पाठिंबा दर्शविला असून, सरकारच्या निषेधार्थ सोमवार, दि. ६ जुलै रोजी येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनात विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

देशातील लाखो विद्यार्थी ज्या नीट, TET व CBSE परीक्षांच्या माध्यमातून आपले भविष्य घडविण्याचे स्वप्न पाहत आहेत अशी एकही परीक्षा सुरक्षित राहिली नसून, त्या परीक्षेचे पेपर एका मागून एक फुटल्या जात आहेत. पेपर फोडीच्या माध्यमातून गुणवत्ता नसलेली लोकं पैशांच्या जोरावर पेपर विकत घेऊन डॉक्टर होऊ पाहत असलेल्या बोगस डॉक्टरांच्या हाती देशाच्या आरोग्य व्यवस्थेचे भवितव्य आपण सोपवणार आहोत का? असे अनेक प्रश्न जनतेच्या समोर पडले आहेत.

## माणिकराव देवराये यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी) –** हिमायतनगर तालुक्यातील कामारी येथील रहिवासी तथा सेवानिवृत्त सहकार अधिकारी माणिकराव बापूराव देवराये (वय ८०) यांचे अल्पशा आजाराने शनिवार, दि. ४ जुलै रोजी सकाळी ६ वाजता निधन झाले.

त्यांच्या पार्थिवावर शनिवारी दुपारी २ वाजता गोवर्धनघाट येथील शांतीधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. माणिकराव देवराये हे विठ्ठलाचे निस्सीम भक्त व वारकरी होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, चार मुली, जावई, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. मराठा सेवा संघाचे प्रदेश प्रशिक्षक प्रा. संतोष देवराये व उमरी येथील तालुका आरोग्य अधिकारी डॉ. मोहन देवराये, सहशिक्षिका सुरेखाताई शिंदे-देवराये यांचे ते वडील होत.



**नांदेड –**सालेगाव येथील जलसंधारण व एसआयआर कामाची जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी नुकतीच पाहणी केली. यावेळी गावकऱ्यांच्या वतीने रोप देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

## हदगाव आणि वजिराबादमध्ये चोरीची घटना

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात मागील दोन दिवसांत चोरी आणि घरफोडीच्या घटना घडल्या असून, याप्रकरणी हदगाव आणि वजिराबाद पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हदगाव शहरातील लक्ष्मी-नारायण नगरात राहणारे ज्ञानेश्वर परसराम इंगोले (वय ३५) यांच्या बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश केला. ही घटना १ ते २ जुलै २०२६ रोजी सकाळी १० ते ११ या कालावधीत घडली. चोरट्यांनी कपाटातील सोन्याचे दागिने आणि दोन मोबाईल असा एकूण ७७ हजार ८०० रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेला.

या घरफोडीची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम व त्यांचे सहकारी यांनी लक्ष्मीनारायणनगर भागात जाऊन घटनास्थळाची पाहणी केली. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करण्यात आली, परंतु चोरटे या फुटेजमध्ये दिसत नसल्याने कदम यांनी आपले एक पथक चोरट्यांचा शोध काढण्यासाठी रवाना केले आहे. पीडिताच्या फिर्यादीवरून हदगाव पोलीस ठाण्यात गुन्हा क्र. २०८/२०२६ (कलम ३०५(अ), ३३१ (३) (४) भारतीय न्याय संहिता-२०२३) नोंदवण्यात आला. पोलीस उपनिरीक्षक शिंदे हे या प्रकरणाचा तपास करत आहेत.

तर दुसरी चोरीची घटना नांदेड शहरातील वजिराबाद येथील मामीडवार कृषी सेवा केंद्राजवळ घडली. २ जुलै रोजी दुपारी १२.३० वाजता अज्ञात चोरट्याने ताराबाई विरेंद्र आऊलवार (वय ६०) यांची बॅग चोरली, ज्यामध्ये १५ हजार रुपये नगदी होते. या प्रकरणी वजिराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा क्र. ३३३/२०२६ (कलम ३०३ (२) भारतीय न्याय संहिता-२०२३) नोंदवण्यात आला. तपास पोलीस हवालदार साखरे करीत आहेत.

## 'एमआयएम'कडून 'एसआयआर'ची जनजागृती




**नांदेड (प्रतिनिधी)–** एमआयएम पक्षाच्या वतीने शहराच्या देगलूर नाका येथील मुख्य कार्यालयापासून एसआयआर अभियानाची जनजागृती करण्यात आली.

यावेळी एमआयएमचे माजी प्रदेशाध्यक्ष सय्यद मोईन, एमआयएमचे मराठवाडा माजी अध्यक्ष फिरोज लाला, मनपा विरोधी पक्षनेता मसूद खान, एमआयएमचे गटनेता सय्यद मुजीब सय्यद मुख्तार, माजी उपमहापौर शमीम अब्दुल्ला, नगरसेवक लतीफ लोखंडवाला, नगरसेवक सय्यद फसीहोद्दीन, नगरसेवक ॲड. मोहम्मद नासेर, नगरसेवक अल्ताफ हुसेन, नगरसेवक प्रतिनिधी हाफीज बागवान, माजी नगरसेवक रहीम खान, नगरसेवक प्रतिनिधी अन्सार अहमद खान, नगरसेवक प्रतिनिधी इरफान खान, नगरसेवक प्रतिनिधी सरहान अलकसेरी, हबीब बागवान, नगरसेवक प्रतिनिधी ॲड. सय्यद माजीद, इमरान धोंगडे, सोहेल रमजनी, हुसेन पहलवान, मुसा लाला, शेख जावेद, इमरान पटका, शेख बबलू नोटरी, रऊफ बिल्डर, सऊद चाउस, रहीम कुरेशी यांच्यासह एमआयएमचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## जुन्या वादातून प्राणघातक हल्ला; दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** जुन्या नांदेड भागातील चौफाळा येथील शनिदेव गल्ली परिसरात जुन्या वादातून एका १९ वर्षीय तरुणावर दोघांनी संगनमत करून प्राणघातक हल्ला केला. ही घटना ३ जुलै रोजी सायंकाळी ४ वाजण्याच्या सुमारास घडली.

चौफाळा परिसरातील शनिदेव गल्ली भागात राहणारे शंकर किशन जिंदम उर्फ चिंग्या आणि मारोती गुंडेवार यांनी संगनमत करून जुन्या वादाच्या कारणावरून याच भागात राहणारा दुर्गेश गुरुप्रसाद चलिन्द्रवार (वय १९) याला ठार मारण्याच्या उद्देशाने खंजरने गळ्यावर गंभीर वार करून जबर दुखापत केली. या हल्ल्यात दुर्गेश गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

या घटनेप्रकरणी जखमी दुर्गेश गुरुप्रसाद चलिन्द्रवार याच्या फिर्यादीवरून इतवारा पोलीस ठाण्यात वरील दोघांविरुद्ध इतवारा ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक गवळी हे करीत आहेत.

## कै. सौ. कुसुमताई चव्हाण स्मृती पुरस्कार जाहीर; राजेंद्र दर्डा यांना डॉ. शंकरराव चव्हाण जीवनगौरव



### विजया रहाटकर यांना स्मृती पुरस्कार; विजेत्यांमध्ये डॉ. बालाजी आसेगावकर, मंदार भारदे, दिव्या देशमुख यांचाही समावेश

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील दैनिक सत्यप्रभाचे यंदाचे कै. सौ. कुसुमताई चव्हाण स्मृती पुरस्कार जाहीर झाले आहेत. यावर्षी प्रथमच डॉ. शंकरराव चव्हाण जीवनगौरव पुरस्काराचा समावेश करण्यात आला असून, लोकमत समूहाचे एडिटर-इन-चिफ तथा माजी मंत्री राजेंद्र दर्डा त्याचे पहिले मानकरी ठरले आहेत. त्याचप्रमाणे महिला आयोगाच्या अध्यक्ष विजयाताई रहाटकर, छत्रपती संभाजीनगर येथील स्नेहसावलीचे संस्थापक डॉ. बालाजी आसेगावकर, विमान क्षेत्रात गगनभरारी घेणारे मॅब एव्हिएशनचे संस्थापक मंदार भारदे व महिला बुद्धिबळ विश्वविजेती दिव्या देशमुख यांना कै. सौ. कुसुमताई चव्हाण स्मृती पुरस्कार जाहीर झाले आहेत.

दैनिक सत्यप्रभाचे कार्यकारी संपादक संतोष पांडागळे यांनी शनिवारी या पुरस्कारांची घोषणा केली. यंदाच्या पुरस्काराचे मानकरी निश्चित करण्यासाठी दैनिक सत्यप्रभाचे मार्गदर्शक माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली निवड समिती गठीत करण्यात आली होती. या समितीत नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चास्कर, प्रख्यात वैद्यकतज्ज्ञ डॉ. नंदकुमार मुलमुले, वरिष्ठ पत्रकार संजीव कुलकर्णी व राजेश निस्ताने आणि उद्योजक सुमित मोरगे यांचाही समावेश होता. माजी केंद्रीय गृहमंत्री तथा माजी मुख्यमंत्री डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्राच्या विविध क्षेत्रात उठावदार कामगिरी करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींना मागील २२ वर्षांपासून या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात येते.

कै. सौ. कुसुमताई चव्हाण स्मृती पुरस्कारांच्या यापूर्वी मानकऱ्यांमध्ये अभिनेते जॅकी श्रॉफ, साहित्यिक फ. मु. शिंदे, रामायणाचार्य हभप रामराव महाराज ढोक, डॉ. तात्यासाहेब लहाने, श्रीमती कुसुमताई रसाळ, नागनाथ फटाले, शैलाताई लोहिया, क्रिकेटपटू संजय बांगर, अभिनेता मकरंद अनासपुरे, ज्येष्ठ संपादक महावीर जोंधळे, नाट्य दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी, डॉ. विठ्ठल लहाने, सकाळ समूहाचे संपादक डॉ. निलेश खरे, नाट्य व चित्रपट दिग्दर्शक वामन केंद्रे, अभिनेत्री प्रतीक्षा लोणकर, सनदी अधिकारी राध्येश्याम मोपलवार, डॉ. विपीन इटणकर आदींचा समावेश आहे. पुरस्कार वितरण सोहळा जुलै महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये संपन्न होणार आहे.

## निलूबाई करकले यांचे निधन



**नायगांव (प्रतीनिधी) –**येथून जवळच असलेल्या शेळगाव (गौरी) ह. मु. धुप्पा (ता. नायगांव) येथील निलूबाई तुकाराम करकले यांचे दीर्घ आजाराने शनिवार, दि. ४ जुलै रोजी सायंकाळी ७ वाजता निधन झाले. मृत्युसमयी त्या ६२ वर्षांच्या होत्या.

त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे. कै. निलूबाई करकले यांच्या पार्थिवावर रविवार, दिनांक ५ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता धुप्पा-शंकरनगर येथे अत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

## एक लाख ३४ हजारांच्या अवैध गुटख्यासह एकास अटक



**नांदेड (प्रतिनिधी) –**राज्यात गुटखाबंदी असतानाही मोठ्या प्रमाणात गुटख्याची तस्करी करून तो काळ्या बाजारात विक्री होत असल्याच्या अनेक तक्रारी वरिष्ठ कार्यालयापर्यंत पोहोचल्याने अखेर पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ यांच्या आदेशावरून इस्लापूर पोलिसांनी कारवाई केली. यावेळी एकाला अटक करून त्याच्याकडून एक लाख ३४ हजार रुपयांचा अवैध गुटखा साठा जप्त केला आहे.

जिल्ह्यात प्रतिबंधित गुटखा, पान मसाला व सुगंधित तंबाखूची विक्री करणाऱ्यांविरुद्ध विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने दिनांक ३ जुलै रोजी इस्लापूर पोलिसांच्या पथकास मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे हुंडी ते तोटंबा मार्गावरील नाल्याजवळ सापळा रचून कारवाई केली. यावेळी एका मोटारसायकल (एमएच-२६-डीबी-१३७४) वरून प्रतिबंधित गुटखा, पान मसाला व सुगंधित तंबाखूची वाहतूक करून विक्रीसाठी नेत असल्याचे आढळून आले.

कारवाई दरम्यान आरोपीच्या ताब्यातून महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला विविध कंपन्यांचा गुटखा, पान मसाला व सुगंधित तंबाखू असा ५४ हजार ८८२ रुपये किमतीचा मुद्देमाल तसेच ८० हजार रुपये किमतीची मोटारसायकल असा १ लाख ३४ हजार ८८२ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी आरोपी दीपक गणेश आलडवाड (वय ३०, रा. किनवट) याच्याविरुद्ध इस्लापूर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ८४/२०२६ कलम १२३, २७४, २७५ भारतीय न्याय संहितासह कलम २६, २७, ३० (२) (अ) अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

## पांडुरंग चौदंते यांचे निधन



**मुदखेड (प्रतिनिधी) –** मुदखेड शहरातील भीमनगर येथील रहिवासी तथा ज्येष्ठ नागरिक सेवानिवृत्त लाईनमेन कॉ. पांडुरंग माणिकराव चौदंते यांचे दि. ३ जुलै २०२६ रोजी सायंकाळी अल्पशा आजाराने वयाच्या ७४ व्या वर्षी निधन झाले.

त्यांच्या पार्थिवावर शनिवार, दि. ४ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता बौद्ध स्मशानभूमी, भीमनगर मुदखेड येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुले, दोन मुली, नातवंड असा परिवार आहे.

## नरसी येथे दिव्यांगांसाठी कृत्रिम अवयवाचे वितरण



**नरसीफाटा (वार्ताहर) –** महाराष्ट्र शासनाच्या दिव्यांग कल्याण विभाग, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय, जिल्हा परिषद नांदेड, एस.आर. ट्रस्ट (मध्य प्रदेश) आणि आलिम्को, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने नायगाव तालुक्यातील अस्थिव्यंग दिव्यांगांसाठी कृत्रिम अवयवांचे मोजमाप व तात्काळ वितरण शिबिराचे आयोजन करण्यात आले. नरसी येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत आयोजित या शिबिरात १२० दिव्यांगांची तपासणी करण्यात आली असून, त्यापैकी ८० पात्र लाभार्थ्यांना कृत्रिम हात, कृत्रिम पाय, कॅलिपर्स आदी साहित्याचे ऑन-द-स्पॉट वितरण करण्यात आले.

या शिबिराचे आयोजन जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय, निवासी मूकबधिर विद्यालय नरसी, झोलेबाबा निवासी अस्थिव्यंग विद्यालय नायगाव, अपंग निवासी विद्यालय नरसी तसेच पंचायत समिती नायगाव यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.

कार्यक्रमाला पंचायत समिती नायगावचे गटविकास अधिकारी प्रवीणकुमार वानखेडे, एस.आर. ट्रस्टचे संचालक डॉ. रुपेश जाधव, आलिम्को, मुंबईचे डॉ. आकाश यादव, प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेचे जिल्हाध्यक्ष गोपीनाथ सांगवीकर मुंडे, जिल्हा सचिव मारुती मंगरुळे, जिल्हा संपर्कप्रमुख राजेश बेळगे, तालुकाध्यक्ष साईनाथ बोईनवाड यांच्यासह विविध दिव्यांग संघटनांचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिबिरात लाभार्थ्यांची तज्ज्ञांकडून तपासणी करून त्यांच्या गरजेनुसार कृत्रिम अवयवांचे मोजमाप घेण्यात आले. पात्र लाभार्थ्यांना कृत्रिम अवयवांचे तत्काळ वाटप करण्यात आल्याने दिव्यांगांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले. या उपक्रमाला नायगाव तालुक्यातील दिव्यांग बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी निवासी मूकबधिर विद्यालय नरसी, झोलेबाबा निवासी अस्थिव्यंग विद्यालय नायगाव आणि अपंग निवासी विद्यालय नरसी येथील सर्व अधिकारी, शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. दिव्यांगांना आवश्यक सहाय्यभूत साधने सहज उपलब्ध करून देण्यासाठी अशा प्रकारचे उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com